बुधवार, १४ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १७६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 14 FEBRUARY 2024 adhunikkesari.com • YEAR-03 • ISSUE-176 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# शेतकऱ्यांवर अश्रूधुरांचा मारा

## किमान आधारभूत किमतीच्या कायद्यासाठी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : किमान आधारभूत किमतीसाठी कायदा करण्याच्या प्रमुख मागणीसाठी पंजाब आणि हरियाणातील हजारो शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा राजधानी दिल्लीच्या दिशेने कूच केली. हजारो शेतकरी त्यांचे ट्रॅक्टर, ट्रक घेऊन दिल्लीच्या वेशीवर धडकले आहेत. देशभरातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींशी चंडीगडमध्ये केंद्र सरकारने चर्चा केली. परंतु चर्चेच्या पहिल्या फेरीत कुठल्याही प्रकारचा तोडगा निघाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन तीव्र केले आहे. शेतकरी शंभू सीमेवर दाखल झाले. पोलिसांनी शेतकऱ्यांना पुढे जाण्यास मज्जाव केला. तर शेतकऱ्यांनी मागे हटण्यास नकार दिला. त्यामुळे आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या.**



दरम्यान, पोलिसांनी शेकडो शेतकऱ्यांना ताब्यात घेतले. दुसऱ्या बाजूला सिंघू सीमेवरही पोलिसांनी नाकेबंदी केली आहे. शेतकऱ्यांनी १६ फेब्रुवारी रोजी 'भारत बंद'ची हाक दिली आहे. शेतकरी सकाळी १० वाजता पंजाबच्या फतेहगड साहिब येथे दाखल झाले होते. शेतकरी आता शंभू सीमेवर दाखल झाले आहेत. चंदीगडमध्ये सोमवारी सायंकाळी केंद्रीय मंत्री आणि शेतकरी प्रतिनिधींची बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर केंद्र सरकार कुठल्याही प्रकारचा तोडगा काढू शकले नाही. या बैठकीनंतर शेतकरी-कष्टकरी संघर्ष समितीची सरचिटणीस सर्वनसिंह पंढेर म्हणाले, या सरकारला केवळ आमचे आंदोलन पुढे ढकलायचे आहे. चर्चेसाठी त्यांचे दरवाजे यापुढेही खुले असतीलच. परंतु, शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी इच्छाशक्ती हवी. सरकारची इच्छा असेल तर ते एमएसपी कायदा आणि शेतकऱ्यांच्या इतर मागण्या मान्य करू शकतात.

**दिल्ली सरकारने केंद्राचा प्रस्ताव फेटाळला :** दिल्लीच्या सीमांवर हजारो शेतकरी जमा झाले आहेत. त्यामुळे या आंदोलनादम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास शेतकऱ्यांवर कारवाई करण्यासाठी दिल्लीतील बवाना मैदानाचे स्वरुपात तुरुंगात रुपांतर करण्यासाठी मोदी सरकारने दिल्ली सरकारकडे परवानगी मागितली होती. मात्र दिल्ली सरकारने ही मागणी फेटाळली आहे. दिल्लीचे गृहमंत्री कैलास गेहलोत यांनी यावर सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. "आंदोलक शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त आहेत. शांततेत आंदोलन करण्याचा प्रत्येकालाच संवैधानिक अधिकार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अटक करणे हे चुकीचे आहे, असे कैलास गेहलोत म्हणाले.

**२०० शेतकरी संघटना सामील झाल्याचा दावा :** केंद्र सरकारच्या वादग्रस्त तीन कृषी कायद्यांविरोधात तीन वर्षांपूर्वी (२०२१) प्रामुख्याने पंजाब व हरियाणा या दोन राज्यांतील शेतकरी संघटनांनी दिल्लीच्या वेशींवर वर्षभर आंदोलन केले होते. त्यानंतर पुन्हा शेतकरी आक्रमक झाले आहेत. मात्र, या वेळी 'संयुक्त किसान मोर्चा' अधिकृतपणे आंदोलनामध्ये सहभागी झालेला नाही. नव्या आंदोलनामध्ये देशभरातील २०० शेतकरी संघटना सामील झाल्याचा दावा 'संयुक्त किसान मोर्चा'चे नेते जगजित सिंग डल्लेवाल यांनी केला आहे.

**हरियाणातही कडेकोट सुरक्षा :** दिल्लीसह हरियाणातील अधिकाऱ्यांनी पंजाबसह राज्याच्या सीमेवर सुरक्षा मजबूत केली आहे. अंबाला, जिंद, फतेहाबाद, कुरुक्षेत्र आणि सिरसा यासह भागात काँक्रीटचे ब्लॉक, लोखंडी खिळे आणि काटेरी तारा बसवल्या गेल्या आहेत. यामुळे दिल्लीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांच्या मार्गात अडथळा निर्माण झाला आहे.

**दिल्लीत खासगी वाहनांचा मार्ग बदलला :** आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. खासगी वाहनांनावर बंधने लादण्यात आली असून सार्वजनिक वाहतूक सेवा पुरवणाऱ्या वाहनांचा मार्ग बदलण्यात आला आहे. दिल्ली वाहतूक नियंत्रण शाखेने पर्यायी मार्गांचीही यादी जारी केली आहे.


# देशात हुकूमशहाचा व्हायरस : उद्धव ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज




**अहमदनगर :** शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे सध्या राज्यभर कुटुंब संवाद दौरा करत आहेत. याअंतर्गत मंगळवारी अहमदनगरच्या श्रीरामपूरमधील भगतसिंग चौकात उद्धव ठाकरे यांची सभा पार पडली. या सभेत बोलताना ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी यांचा नामोल्लेख टाळत देशात हुकूमशाहीचा व्हायरस पसरला असल्याचे वक्तव्य केले. ते म्हणाले, आपण गेले काही दिवस या कुटुंब संवाद दौऱ्याच्या माध्यमातून सातत्याने भेटत आहोत. तुम्हाला हुकमशाहीच्या व्हायरसची जाणीव करून देण्यासाठी मी इथे उभा राहतोय. हा कुटुंब संवाद दौरा आहे. आता कुटुंब संवाद म्हटल्यावर कुटुंबाची काळजी घेणे आलेच. करोना काळात आपण 'माझं कुटुंब, माझी जबाबदारी' ही संकल्पना राबवली होती. या योजनेला सर्वांनी साथ दिली. आता करोना नाहीये, परंतु, एक वेगळा व्हायरस देशात पसरतोय. आधी शिवसेना फोडली, मग राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला, आज अशोक चव्हाणांना फोडलं. ही सगळी फोडाफोडी करुन काय मिळवले? देशाचे गृहमंत्री आहेत अमित शाह, महाराष्ट्राचे आहेत देवेंद्र फडणवीस. त्यांचे कुठल्या शब्दांत वर्णन करावे तेच कळत नाही. कारण 'फडतूस' म्हटले, 'नालायक' म्हटले, 'कलंक' म्हटले काही फरकच पडत नाही. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांच्या मांडीला मांडी लावून फडणवीस बसले आहेत. त्यांची अवस्था आता 'मला नाही अब्रू मी कशाला घाबरु' अशी झाली आहे. निर्लज्ज असतो तोच सुखी असतो. मुख्यमंत्र्याचा पाव उपमुख्यमंत्री केला तरीही तो आनंदात आहे. नितिन गडकरी जे बोललेत जो निष्ठेने काम करतो त्याला किंमत नाही. हे अगदी खरे आहे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांना टोला लगावला.



सस्नेह निमंत्रण
||ज्ञानबातुकाराम||
संत साहित्याला वाहिलेले वार्षिक
||ज्ञानबातुकाराम|| या संत साहित्याला वाहिलेल्या वार्षिकाचा
संत तुकाराम महाराजांचे टाळकरी
या विशेषांकाचे
तुकोबार्पण
वसंत पंचमी (बुधवार, दि. १४ फेब्रुवारी २०२४) अर्थात तुकोबारायांचा जन्मदिन.
त्यानिमित्ताने त्यांच्या देहू येथील जन्मस्थळी सकाळी १० वाजता त्यांच्या जीवलगांच्या कार्याला उजाळा देणारा, 'संत तुकाराम महाराजांचे टाळकरी' हा विशेषांक अर्पण करण्याचा सोहळा होत आहे. आपण या क्षणाचे साक्षीदार व्हावे, म्हणून हे आग्रहाचे निमंत्रण.
आणि वै. ह. भ. प. श्रीधर अण्णा मोरे यांनी लिहिलेल्या जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज चरित्राच्या ५व्या आवृत्तीचे प्रकाशन
हस्ते
डॉ. पी. डी. पाटील
कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ
उपस्थिती
डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
निमंत्रक
ह. भ. प. शिवाजी शंकर मोरे ह. भ. प. प्रल्हाद मोतीरामबुवा मोरे
ह. भ. प. संजय महाराज दामोदर मोरे
विश्वस्त, जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, देहू
डॉ. श्रीरंग गायकवाड
संपादक, ||ज्ञानबातुकाराम||
डॉ. विवेकानंद मोरे
सेवक-पुजारी, जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, देहू.
प्रवचन सेवा : प्रा. डॉ. मंजुषा शरद कदम-मोरे, संत तुकाराम महाराजांच्या ११व्या वंशज. वेळ : सायंकाळी ५ ते ७
भजन सेवा : जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज संतपीठ, चिखली. वेळ : ३.३० ते ५
सर्वांनी आवर्जून यावे, ही विनंती!


सस्नेह निमंत्रण

जन्मशताब्दी वर्ष : 2024-25
वनराई फाऊंडेशन
स्व. डॉ. मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार
प्रदान समारंभ २०२४
वनराईचे सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळ आणि परिवाराच्या वतीने आग्रहपूर्वक निमंत्रण
पुरस्कारार्थी
पद्मभूषण मा. डॉ. सायरस पूनावाला
(संस्थापक – सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया)
शुभहस्ते
पद्मविभूषण मा. श्री. शरदचंद्र पवार
(माजी केंद्रीय कृषिमंत्री, भारत सरकार)
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण
(माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)
सन्माननीय अतिथी
मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा
(मुख्य सल्लागार, कुलपती-कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराड, जि.सातारा)
सदर कार्यक्रमास आपण अवश्य उपस्थित राहावे, ही विनंती.
निमंत्रक
श्री. रवींद्र धारिया
अध्यक्ष - वनराई, पुणे
डॉ. गिरीश गांधी
अध्यक्ष - वनराई फाउंडेशन, नागपूर
दिनांक व वेळ
बुधवार, दि. १४ फेब्रुवारी २०२४
सायंकाळी ०४:४५ वाजता
स्थळ
बालगंधर्व रंगमंदिर, शिवाजीनगर, पुणे
संपर्क : पुणे ०२०-२४४२१३५१, नागपूर ०७१२-२५४३४७६ contact@vanarai.org www.vanarai.org





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

( नुकतेच अमळनेर येथे अखिल भारतीय साहित्य संमेलन पार पडले. ते कितपत यशस्वी झाले याबद्दल वेगवेगळी मते/वाद ऐकायला मिळतात. त्या पार्श्वभूमीवर माझा पूर्वी लिहिलेला हा लेख आपल्याला नक्कीच आवडेल. हा लेख आता नुकत्याच प्रकाशित झालेल्या अजूनही चांदरात आहे या पुस्तकात आहे ) रात्रीची शांत वेळ. शहरातली वर्दळ आता कमी झाली होती. रस्ते मोकळा श्वास घेऊ लागले होते. कधी कधी रात्रीची शांत वेळ मला फिरण्यासाठी योग्य वाटते. बऱ्याच वेळा मी या गोदावरीच्या काठी येऊन बसतो. गोदामैया शांतपणे वाहत असते. तिच्या पात्रामध्ये दिव्यांचे छान प्रतिबिंब पडलेले असते. आजबाजूला असणाऱ्या अंधाराच्या पार्श्वभूमीवर गोदामैयाचे हे रूप मला भावते. दिवसभर तिच्या काठाशीही वर्दळ असते. भाविक येतात, व्यापारी येतात,श्रीमंत, गरीब, लहान थोर सारे सारे गोदामाईचा आश्रय घेतात. पण रात्री आपापल्या मुक्कामी निघून जातात. गोदामाई काही म्हणत नाही. पण रात्रीच्या शांत वेळी तिच्या तीरावर जाऊन बसावं. ती यावेळी निवांत असते. दिवसा तिला काही बोलावसं वाटत नसलं तरी यावेळी ती आपलं मन मोकळं करते.
असाच मी तिच्या कुशीत जाऊन बसलो. अंमळ थंडीच होती. पण तिच्याजवळ बसलं की सगळं काही विसरायला होतं. माई म्हणाली, ' आलास. ये. बैस जरा. तुला खूप काही सांगायचं आहे. पण त्या आधी तिकडे पलीकडे माझी सखी उभी आहे. आम्ही दिसायला वेगवेगळ्या असलो तरी माझा आणि तिचा आत्मा एकच आहे. तू माझ्याकडे जसा हक्काने येतोस, तसाच तिच्याकडेही जा. तिची थोडी विचारपूस कर. मग पुन्हा तुझ्याशी बोलायला मी आहेच. ' मी म्हटलं, ' माई, तू काळजी नको करुस. मी जातो लगेच तिच्याकडे आणि तिला काय हवं नको ते पाहतो. '
मी गेलो. खरंच भरजरी वस्त्र लेऊन एक कुलीन, घरंदाज स्त्री उभी होती. कपाळावर कुंकवाचा टिळा होता. मुद्रेवर न लपणारं विलक्षण तेज होतं. मी तिला प्रणिपात केला. म्हटलं, ' मला गोदामैयाने पाठवलं तुमच्याकडे.



## आनंदी पहाट

### संस्कृतीनुरूप प्रकृतीद्वारे समाजातील विकृती दूर करावी

आधुनिक केसरी

आपल्या आचाराचा संबंध ग्लॅमरशी तर विचारांचा संबंध थेट ग्रामरशी असल्याचं प्रथम समजून घेणं अधिक जरुरीचं असतं. आपल्या विचारांतून आपल्या संकृतीचं आणि प्रकृतीचं दर्शन घडून येत असतं. पण विचारांपुर्वीच केलेल्या आचारातून काहीवेळा काहीजणांमध्ये विकृतीचं दर्शन घडतं, ते कोणालाच मान्य नसतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एकूणच अशांतून नकारात्मक वातावरण निर्माण होत राहतं, ते अधिक तापदायक, घातक ठरू शकतं, ह्याची जाणीव होणं आवश्यक असतं. प्रगल्भ विचार आणि दिलदार मन लाभलेली कोणतीही व्यक्ती आकृती उरत नसते, तर ती स्वतःच एक कलाकृती बनून राहते. अशी व्यक्ती आपल्या संस्कृतीचं स्मरण ठेवून, स्वतःच्या प्रकृतीला अनुसरून, समाजातील विकृतीकरण थांबवण्यात सक्रीय असते. यांतूनच कलाकृती साकारली जात असते, पाहायला मिळते. अशा व्यक्ती आपलं जगण्यापलीकडचं जीवन सामाजिक बांधिलकीचं भान राखून नवनवीन कलाकृती साकारत असतात.
हल्ली अनेकजणांना सोशल मिडीयानं ग्रासलं आहे. फेसबुक, युट्यूब, व्हॉटस् ॲप इत्यादीच्या माध्यमातून अनकेदा बघायला मिळणाऱ्या काही पोस्ट, छायाचित्रं, व्हिडीओ, मजकूर हे सर्व कितपत सत्याची बाजू घेणारं असतं, हे समजणे अवघड असतं. त्यांत समाविष्ट असलेली नकारात्मकता मात्र थेट आपल्या अंतर्मनावर विपरीत परिणाम करायला लागते. कदाचित एखाद्या व्यक्तीचं यश देखील आपल्या मनांत नकारात्मक विचार निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकतं. अलीकडच्या काळांत अल्पवयीन मुलं-मुली नैराश्याचे शिकार होताना दिसत आहेत. नकारात्मक विचारांचं पर्यवसान रागात, उद्वेगात आणि कालांतराने गुन्हेगारीत होण्याचं प्रमाण अलीकडच्या काळांत खूपच वाढल्याचं दिसून येत आहे.



आधुनिक केसरी

### विठ्ठल गावला | वृंदावनी ||

मांगल्य पावित्र्य | तुळशीची माळ ||
सुखावतो काळ | निरंतर ||१||
समाधान सांगे | चंदनाचा टिळा ||
प्रारब्धाची शिळा | धन्य झाली ||२||
तार लय सूर | गाते वीणा टाळ ||
अभंगाशी नाळ | श्वास जोडी ||३||
सात्विकात न्हाली | आत्म्याची सावली ||
खेळते पावली | नामा संगे ||४||
ओढ पंढरीची| लागता जीवाला ||
विठ्ठल गावला | वृंदावनी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

नाइटे अंदु गजकर्ण ।पेहाचे पोट विस्तीर्ण ।
बैसलें टाळें फुटती कर्ण ।या नांव आध्यात्मिक ॥२०॥
कुष्ट आणि वोला कुष्ट ।पंड्यारोग अतिश्रेष्ठ ।
क्षयरोगाचे कष्ट ।या नांव आध्यात्मिक ॥२१॥
वाटी वटक वायेगोळा ।हातीं पाईं लागती कळा ।
भोवंडी लागे वेळोवेळां ।या नांव आध्यात्मिक ॥२२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मोटा पतला छोट बड़,
औरो रुप कुरुप ।
मैं हूँ मोर स्वरुप है, यह भ्रम पर भवकूप
।।५१।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/५१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आत्मा अज्ञानानेच प्रकृतीच्या स्वरूपाला आपले स्वरूप समजत आहे. मी, माझे, मोठा, छोटा अशा शरीराच्या स्वरूपाला आपले स्वरूपसमजून अज्ञानरूपी कूपात पडलेला आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## संत एकनाथ


आधुनिक केसरी



त्यांच्या संबंधी अनेक कथा सांगितल्या जातात. सहाव्या सातव्या पिढीतील काशिनाथबुवा व रामचंद्रबाबा (२रे) यांचा मोठा प्रभाव भोसले,पेशवे, शिंदे, होळकर,निंबाळकर,गायकवाड, धार देवास आदींवर असल्याचे दिसते. काशिनाथ बुवा यांचा उल्लेख गायक म्हणून येतो तर रामचंद्रबाबा (२रे) यांचा उल्लेख कीर्तनकार व गायक म्हणून येतो. सद्यपरिस्थितीत योगिराज महाराज गोसावी ( योगिराज पैठणकर ) यांचे नाव नाथांचे १४ वे वंशज म्हणून संप्रदायात अग्रक्रमाने घेतले जाते.

## राम ठेवील त्यात समाधान राखावें ।

आधुनिक केसरी



प्रपंचीं राहून समाधान । हेंच मोठें ज्ञानाचें ज्ञान ॥ भगवंताचा हात जेथें । समाधान सुख राहातें तेथें ॥ राम ठेवील त्यांत समाधान राखावें । हाच सुखी होण्याचा मार्ग जाण ॥ रामापायीं अनन्य झाला । समाधान चालत येई घराला ॥ ज्याचे अंतःकरणांत समाधान । तेथें भगवंताच्या प्रेमाची उत्पत्ति जाण ॥ आपलें असमाधान होण्याचें कारण । रामाहून दुसऱ्याचें झालों आपण ॥ उपाधिरहित रामास पाहावें । मध्यंतरीं चित्त कोठें न गुंतवावें ॥ चित्त गुंततां मध्यस्थळीं । परमात्म्याची प्राप्ति दुरावली ॥ भगवंताचें स्मरण । तसेंच भगवंताचें आगमन । पुण्याईशिवाय घडत नाहीं जाण ॥ श्रीराम सर्वव्यापी हा ठेवून विश्वास । समाधान राखावें खास ॥ दाता एक रघुनंदन । हा भाव ठेवावा मनांत । त्यास दैन्यपण न येईल जगांत ॥ धर्माचें रक्षण । ठेवतां परमात्म्याचें स्मरण ॥ राम आपल्या दासावरी । नित्य कृपा करी ॥ राम परमात्मा कृपा करतो । सर्व चुकीची क्षमा करतो ॥ पुन्हा वाईट न वागावें । याबद्दल जबाबदारीनें वर्तावें ॥ ' अंतीं घेतां माझें स्मरण । मी उद्धरीन त्यास आपण' । हें खुद्द भगवंताचें वचन । तेथें नसावें शंकेचें कारण ॥ रघुनाथावांचून सुखी झाला । असा नाहीं कोणीं पाहिला, ऐकिला ॥ मीपणाचा सोडावा अभिमान । तोच एक भगवंताचा झाला जाण ॥ राजाची झाली भेट । खालच्यांचें नाहीं महत्त्व तेथें । तैसें जगन्नियंत्या प्रभूस करावें आपलें ॥ आजवर रामानें सांभाळ केला । तो आजहि नाहीं निजलेला ॥ पण त्याची जागृति । असे आमचे हातीं ॥ काळावर ज्याची सत्ता । त्याचे चरणीं ठेवावा माथा । मग धोका नाहीं ही मानावी सत्यता ॥ राम ज्याच्या हृदयीं करी वास । तेथें ऋद्धिसिद्धी पडल्या ओस ॥ निःस्वार्थापाशीं भगवंत । हा जाणावा सिद्धांत ॥ राम कर्ता हा ठेवावा भाव । कमीपणाला नाहीं ठाव ॥ कर्तव्य करावें निःस्वार्थबुद्धीनें । राम खूष होईल त्यानें ॥ ज्याला नाहीं दुसरा उपाय । तेथें मागावें भगवंताचें साहाय्य ॥ परमात्मा ज्याचा साह्यकारी । त्यास धोका नाहीं तिळभरी ॥ देह आहे परतंत्र । मन राखावें भगवंताशीं स्वतंत्र ॥ विषयविरहित मारावी हांक । तुमचे समोर माझा दाशरथि राम ॥ रामानें करावें सर्वांचे कल्याण । दुष्टास सुबुद्धि देऊन जाण ॥ दीनदयाळु परमात्मा राम खास । न ठाव द्यावा विकल्पास ॥ त्याच्याशीं वागावें सत्य । कृपा करील भगवंत ॥ अखंड करा नामस्मरण । जेणें कृपा करील रघुनंदन ॥

**३४५. भगवंतानें काय दिलें तें पहावें । त्यांत समाधान राखावें ॥**

## जंगली महाराज

आधुनिक केसरी

जंगलीमहाराज हे नाव महाराष्ट्राच्या संतमंडळात प्रख्यात आहे. जंगली महाराज हे मध्ययुगीन संत नसून अगदी अलीकडच्या काळातील संत होते. जंगली महाराज या नावावरून ते कोणत्या धर्माचे वा कोणत्या पंथाचे होते, याची काहीच कल्पना येत नाही. हे नाव इतके रूढ झाले आहे की, ते आपलेच संत आहेत, असे विविध धर्मांच्या आणि पंथांच्या लोकांना वाटते आणि यातच त्यांचे खरे संतत्त्व दडले आहे. जंगलीमहाराज म्हटले की, ते पुण्याचेच अशीही एक सर्वसामान्य समजूत आहे. तीही चुकीची आहे, असे म्हणता येणार नाही, कारण महाराजांचे वास्तव्य बराच काळ पुण्यातच होते आणि त्यांचे बरेचसे कार्यही पुण्यातच झाले आहे. जंगली महाराज हे अलीकडील काळातील संत असूनही त्यांच्या जीवनचरित्राचा फारसा तपशील जनसामान्यांना माहीत नव्हता. तो उपलब्ध करून घेण्यासाठी पुण्यातील चित्रकार डी. डी. रेगे यांनी जवळपास बारा वर्षे संशोधन करून बरीच माहिती गोळा केली. त्यासाठी ते महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांतील विविध भागांत गेले, जंगलीमहाराजांच्या शिष्यप्रशिष्यांना भेटले, त्यांच्या घराण्यातील लोकांना भेटले.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १४ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# वनराई संस्थेचे एक आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** १४ फेब्रुवारी रोजी वनराई संस्थेचे संस्थापक, खासदार, केंद्रीय मंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष व स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय डॉ.मोहन धारिया यांची ९९ वी जयंती साजरी केली जात आहे.तसेच त्यांच्या कार्याला स्मरण करण्यासाठी वनराई संस्थेकडून विशेष प्रयत्न केले जात आहे. त्यांच्या संपूर्ण कार्याला प्रकाझोतात आणण्यासाठी वनराई संस्थेने एक विशेष आवाहन सर्वांना केलेले आहे. या आवाहनातून असे म्हटलेले आहे की,जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या उत्तुंग, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला आणि राष्ट्राप्रतीच्या योगदानाला समर्पित वनराई 'विशेषांक'रूपी स्मरणिकेचे आणि गौरव ग्रंथा'चे प्रकाशन करण्याचा 'वनराई संस्थेचा मानस आहे. देशभरातील विविध क्षेत्रातील नामवंत मान्यवरांनी सार्वजनिक हिताकरिता डॉ.मोहन धारिया यांचे लाभलेले मार्गदर्शन, सहकार्य आणि योगदान याबाबतचे आप आपले अनुभव लेखाच्या तसेच मुलाखतीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले आहेतच; परंतु या व्यतिरिक्तही अशा अनेक व्यक्ती असतील की, ज्यांचा मोहन धारियांसोबत दीर्घकाळ ऋणानुबंध राहिला. ज्यांच्याकडे त्यांच्या काही विशेष आठवणी आहेत. काही महत्त्वाच्या घटनांचे साक्षीदार होण्याची,त्यांच्या मार्गदर्शनाची, सोबतच्या चर्चाची संधी ज्यांना मिळाली असेल आणि यातून डॉ.मोहन धारिया यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ज्ञात-अज्ञात पैलू समजले असतील, अशा समाजातील सर्व स्तरातील व्यक्ती आणि संस्थांना डॉ.मोहन धारिया यांच्यावरील लेखन, छायाचित्रे आणि व्हिडीओ पाठवण्याचे आवाहन 'वनराई' संस्थेच्या वतीने करत आहोत, असे वनराई संस्थेच्या वतीने म्हटले आहे.

एखादी घटना, किस्सा यावर आधारित लहानसा परिच्छेद असो किंवा विस्तृत घडामोडींवर,प्रसंगांवर आधारित दीर्घ लेख असो, दोन्हींचेही महत्त्व आमच्या दृष्टीने सारखेच असल्याने लेखनासाठी शब्द मर्यादेचे बंधन ठेवण्यात आलेले नाही.

आपल्या आठवणी आणि विचार आमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी पत्र/ इमेल/ व्हॉट्सअ‍ॅप /ऑडियो रेकॉर्डिंग यापैकी कोणतेही माध्यम आपण वापरू शकता. शिवाय मराठी/हिंदी/इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य लिहिणाऱ्याला आहे. समक्ष किंवा दूरध्वनीवरील मुलाखतीसाठी आपली वेळ उपलब्ध करून दिल्यास आमच्यासाठी आनंदाचीच बाब असेल. तसेच डॉ.मोहन धारिया यांची छायाचित्रे आपणाकडे असल्यास ती देखील उपलब्ध करून दिल्यास आम्ही अशा व्यक्ती व संस्थांचे अत्यंत आभारी असू, संबंधित व्यक्तीच्या नावानिशी त्यांचे लेखन प्रकाशित केले जाईल,तसेच छायाचित्र उपलब्ध करून देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेचा नामोल्लेख करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाईल, असे सुद्धा म्हटलेले आहे.

**-पत्रव्यवहारासाठी पत्ता: वनराई मुख्यालय, 498, आदित्य रेसिडेन्सी, मित्रमंडळ चौक,पर्वती, पुणे-411009, दुरध्वनी: 020-24429351/24420351, मोबाइल: 7720056738,इमेल: EDITOR@VANARAI.ORA**

# स्व. डॉ. मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पद्मविभूषण स्व.डॉ. मोहन धारिया यांची ९९ वी जयंती दि.१४ फेब्रुवारी २०२४ रोजी साजरी होत



असून पुढील वर्षभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांचे 'जन्मशताब्दी वर्ष' साजरे केले जाणार आहे.जयंतीचे औचित्य साधून १४ फेब्रुवारी रोजी स्व. डॉ.मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार प्रदान समारंभ सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.हा समारंभ सोहळा सायंकाळी ४ वाजून ४५ मिनिटांनी बालमंदिर रंगमंदिर, शिवाजीनगर पुणे येथे संपन्न होणार आहे.अशी माहिती वनराई पुणेचे अध्यक्ष रविंद्र धारिया आणि वनराई फाऊंडेशन नागपूरचे अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी यांनी दिलेली आहे.स्व.डॉ.मोहन धारिया यांनी केलेले कार्य हे केवळ समाजाच्याच नव्हे तर पर्यावरणाच्या दृष्टीने हिताचे मानले जाते.ते केंद्रिय राज्यमंत्री होते.शिवाय स्वातंत्र्य लढ्यात त्यांचा सहभाग सुद्धा होता.अशा थोर व्यक्तीमत्वाच्या जयंतीचे औचित्य साधून स्व.डॉ.मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार हा दिला जात असतो.

हा कार्यक्रम वनराई परिवारासोबतच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात येणार असून कार्यक्रम प्रसंगी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया संस्थापक पद्मभूषण डॉ.सायरस पुनावाला यांना स्व.डॉ.मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.हा पुरस्कार माजी केंद्रीय कृषिमंत्री पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते देण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे असणार आहेत.सन्मानिय अतिथी म्हणून कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे कुलपती व मुख्य सल्लागार डॉ.वेदप्रकाश मिश्रा हे असणार आहेत. वनराई संस्थेच्या वतीने अनेक खेड्या पाड्यातून कामे सुरू असून अशा भागातील लोकंसुद्धा आवर्जून उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन वनराई संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# नेहरूंवर टीका करणाऱ्यांकडून सत्तेचा गैरवापर : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** कठिण प्रसंगी देश उभा करणाऱ्या माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंवर टीका करणारे सत्तेचा गैरवापर करून मूलभूत अधिकारावर गदा आणत असल्याची टीका राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी केली आहे. ते संविधान हक्क परिषदेने आयोजित केलेल्या एल्गार परिषदेत बोलत होते. राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड, महेश तपासे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

उल्हासनगर कॅम्प नं-५ येथील दसरा मैदानात संविधान हक्क समितीने एल्गार परिषदेचे आयोजन राष्ट्रवादी अंबरनाथ शहराध्यक्ष तथा माजी बांधकाम समिती सभापती सदा मामा पाटिल यांनी केले होते. पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी देशात व राज्यात भयावह परिस्थिती असून राज्याने उत्तरप्रदेश व बिहारला मागे टाकले आहे. देशात कुठेच पोलीस ठाण्यात आमदाराने गोळीबार केला नसेल असे प्रकार शहरात घडत आहेत. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या मुलांनी शिक्षण घेऊ नये यासाठी शिक्षणाचे केंद्रीयकरण करीत असल्याचा आरोप केला.

ज्या नागरिकांना मतदानाचा हक्क दिला, त्यांनी त्याचा वापर केला नाहीतर, देश हुकूमशाहीकडे जात असल्याची खंत व्यक्त केली. यापुढे



साहेबांच्या विरोधात बोलले त्याला सोडणार नसल्याचा इशाराही आव्हाड यांनी दिला. राष्ट्रवादी पक्षाचे नेते शरद पवार यांनी संविधान हक्क परिषदेने आयोजित केलेल्या सभेला आवर्जून आल्याचे सांगितले. सभेला गर्दी महत्वाची नसून या सभेचा उद्देश जनमानसात जाणे आवश्यक असल्याचे पवार म्हणाले. देश स्वातंत्र्य झाला त्यावेळी देश उभा करण्यासाठी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू त्यांच्या मंत्रीमंडळातील डॉ बाबासाहेब आंबेडकरसह अन्य जणांनी जीवाचे रान केले. मात्र ज्यांनी देश उभा केला. त्यांच्यावरच टीकाटिप्पणी होत आहे. शेजारील देशात जी परिस्थिती निर्माण झाली. ती परिस्थिती देशात निर्माण होण्याची भीतीही पवार यांनी व्यक्त केली. पुण्यातील निर्भय बनो या कार्यक्रमा वेळी निखिल वागळेसह अन्य जणांवर हल्ला झाला असून असेप्रकार राज्यात होत आहेत. संविधान व अधिकारावर गदा येत असल्याने, सर्वांनी एकत्र येणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. सभेला महेश तपासे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हासमन्वयक धनंजय बोडारे, राजेश वानखडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रोहित साळवे, अण्णा रोकडे, यांच्यासह अनिल अहिरे, निशा भगत आदी उपस्थित होते.

# अमित शाह यांचा महाराष्ट्र दौरा रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा महाराष्ट्र दौरा तडकाफडकी स्थगित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अमित शाह येत्या 15 फेब्रुवारीला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार होते. त्यांची 15 फेब्रुवारीला छत्रपती संभाजीनगर येथे सभा पार पडणार होती. त्यासाठी जय्यत तयारीदेखील सुरु होती. पण त्यांचा 15 फेब्रुवारीचा दौरा अचानक स्थगित करण्यात आला आहे. हा दौरा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासन अलर्ट झालं होते. प्रशासनाकडून सर्व प्रकारच्या उपाययोजना आणि काळजी घेतली जात होती. पण त्यांच्या दौऱ्याच्या दोन दिवसांआधीच त्यांचा दौरा स्थगित करण्यात आला आहे. त्यांचा दौरा स्थगित होण्यामागचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. खाजगी कारणांमुळे हा दौरा रद्द झाला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.



## यादव यांची टोलेबाजी !

आधुनिक केसरी

गेल्या महिन्याभरात बिहारच्या राजकीय वर्तुळात प्रचंड घडामोडी घडल्याचे पाहायला मिळाले. महिन्याभरापूर्वी भाजपा व मोदींविरोधातील विरोधकांच्या इंडिया आघाडीसाठी जोरकसपणे प्रयत्न करणारे नितीश कुमार स्वत:च भाजपाप्रणीत एनडीए आघाडीत जाऊन बसले. बिहारमध्ये सत्तापालट झाला आणि राजदला दूर लोटून भाजपासोबत नितीश कुमार यांनी सरकार स्थापन केले. यानंतर सोमवारी नितीश कुमार यांच्या बहुमत चाचणीवर बिहार विधानसभेत झालेल्या चर्चेदरम्यान राजद आमदार व माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी तुफान टोलेबाजी केली. नितीश कुमार यांना चिमटे काढताना तेजस्वी यादव यांनी आपण त्यांचा कायम आदर करत राहू, असे विधान केले. मुख्यमंत्री कायम हेच म्हणत राहिले की मी त्यांच्या मुलासारखा आहे. मीही त्यांना माझा पालक मानतो. तुम्ही प्रभू श्रीरामाची चर्चा करता. आपल्या सगळ्यांच्या मनात राम आहेतच. पण जसे प्रभू श्रीरामाचे वडील दशरथ होते तसेच आम्ही नितीश कुमार यांना आमचे पालक मानतो, असे तेजस्वी यादव म्हणताच सभागृहात हशा पिकला! अनेकदा नितीश कुमार म्हणालेत की ‘आता तर हाच सगळे करेल, हाच सगळे पुढे नेईल. तरुणच पुढे जाणार ना? पण हेही खरे की अनेकदा यांचे काही नाईलाज झाले असतील. जसे राजा दशरथाचे झाले होते, ज्यामुळे त्यांनी प्रभू श्रीराम यांना वनवासाला पाठवले. पण आम्ही असे मानतो की आम्ही वनवासाला आलेलो नाही. नितीश कुमार यांनी आम्हाला जनतेमध्ये जनतेचे सुख-दु:ख जाणून घेण्यासाठी पाठवले आहे, असा टोला तेजस्वी यादव यांनी लगावला. नितीश कुमार यांनी सातत्याने बाजू बदलल्याचा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी वेळोवेळी दिलेली कारणे तेजस्वी यादव यांनी सभागृहात सांगितली. आधी जेव्हा त्यांनी आम्हाला दूर लोटले, तेव्हा त्यांचा काय नाईलाज होता हे मला माहिती नाही. कुणालाच माहिती नाही. पण तेव्हा ते एकच म्हणाले की तुमच्यावर खटले आहेत. मग जेव्हा त्यांनी आम्हाला जवळ केले तेव्हा म्हणाले की भाजपावाले फसवतात. ईडी-सीबीआय मागे लावण्याचे काम करतात. मी त्यांना मान देतोच. पण बिहारच्या जनतेला हे जाणून घ्यायचे की असे काय कारण आहे ज्यासाठी तुम्ही कधी इथे तर कधी तिथे असता? असा खोचक सवालही तेजस्वी यादव यांनी केला.

## वासना आणि प्रेम

आधुनिक केसरी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

**प्रेम हे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं, म्हणून माणसाने माणूस जोडावा, प्रेम हे वाईट गोष्ट नाही, प्रेमाशिवाय आपले जीवन पूर्ण नाही पण वासना व प्रेम यातील फरक मुला मुलींना कळणे. हे महत्त्वाचे आहे. जीवनाला सुखाची आंतरिक आनंदाची झालर लागते ती माणुसकीमुळे, प्रेम, जिव्हाळा, परोपकार नसेल तर जिवंत असून काय कामाचे? स्वार्थ, पैसा, आत्मकेंद्रित वृत्ती यामुळे भौतिक सुख उपभोगता येतील पण आंतरिक समाधान हवे असेल तर जगण्यातलं खरंच चैतन्य तुम्हाला राहावे वाटत असेल तर प्रेमाचा झरा जिवंत असायलाच हवा, ज्यांची निवड योग्य आणि आयुष्यभर दोघांचे जुळून येणे संसार शेवटाला जाणे या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत.**

त्यामुळे मुला- मुलींनी एकमेंकाविषयी आकर्षण वाटणारच? कारण ते विषमलिंगी आहेत, ते नैसर्गिक भावना त्यांना आहेत, पण स्वतःवर ताबा ठेवणे हे तेवढेच आवश्यक आहे.

केवळ तुम्ही एखाद्या भावनेच्या आहारी जाऊन चालणार नाही, मानवी जीवनामध्ये काही पुरुष अतिशय निखळ मनाने इतरांवर प्रेम करतात. त्या पद्धतीने त्यांच्यासोबत वागतात, पण काही स्त्री-पुरुष या धावपळीच्या युगात घराबाहेर राहतात,काहीजण स्त्रीला एकटीला गाठून नोकरीच्या ठिकाणी भेटून तिचे लैंगिक शोषण करण्याची हौस करून घेतात. त्यालाच वासना म्हणतात. मानसिक विकृतीमुळे ब-याच जणी या वाममार्गाला बळी पडतात. म्हणून मुलींनी धोक्याच्या ठिकाणी जाणे टाळावे. रात्री अपरात्री काळोख पडल्यावर निर्जन ठिकाणी एकटी जाऊ नये,किंवा फसवणूक करणाऱ्या मैत्रिणीबरोबर सुद्धा जाऊ नये, खाऊ किंवा भेट वस्तू कोणाकडून घेऊ नयेत अयोग्य मित्र निवडू नयेत, नवरात्र व गणेशोत्सवाच्या किंवा आणखी काही कार्यक्रमात उशिरापर्यंत घराबरोबर राहु नये. पालकांनी मुलींना सर्व समजून सांगावे. प्रेमाचा स्पर्श व वासनेचा स्पर्श तिला कळायला हवा पुरुषी नजर तिला समजायला हवी तिच्याशी मोकळा संवाद साधावा, तिला न रागवता तिची समस्या जाणून घ्या, तिला बोलू द्या. तिचे विचार ऐकून घ्यावे, तिने बोललेले जे आहे, त्याची शहनिशा करा, कदाचित तिचं बोलणं उद्याच्या धोक्याची घंटा सुद्धा असू शकते . म्हणून तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करू नका, ती छोटी आहे तिला काय कळते असे बोलून नामानिराळे होऊ नका. वेशभूषा, केशभूषा आधुनिक फॅशनच्या नावाखाली अंग प्रदर्शन यामुळे पुरुष जवळ येतात, म्हणून वासना निर्माण होईल असे कपडे वापरू नका. विकृत रूप धारण करू नका , सर्वांना चांगले दिसेल, आपल्या संस्कृतीचे जतन होईल. असेच तुम्ही वागा. प्रेम हे सर्वांना कळते. कृष्णाचे राधेवर, विठ्ठलाचे रुक्मिणीवर, शेतकऱ्यांचे जमिनीवर आई-वडिलांचे आपल्या मुलांवर, सैनिकांचे देशावर ,शिक्षकांचे विद्यार्थ्यावर असे अनेक प्रेम आहेत. यात कसल्याही वासना नाहीत.ते सोज्वळ, निर्मळ, निखळ प्रेम आहे त्यातले फरक तुम्हाला समजून घ्यावे लागतील, सध्या वर्तमानपत्रातून,



मासिकातून, दूरदर्शन वरून महिलांचे लैंगिक शोषण आपण ऐकत असतो, फक्त या गोष्टीला पुरुषच जबाबदार आहेत असे म्हणता येणार नाही. टाळी एका हाताने वाजत नाही, म्हणून सर्वांनीच चांगल्या पद्धतीने वागावे. अपवादात्मक काही मुलींना वातावरणाशी झुंज द्यावी लागते. काही मुली खरोखरच जुडो- कराटे खेळलेल्या असतात त्यामुळे त्यांच्याकडे वाकडी नजर करून बघण्याची काही जणांची ताकद नसते. परंतु काही मुली हळव्या असतात त्या सहज स्मितहास्य करून बसतात. मुलांना वाटते खरंच आपल्याला ती बोलते मग प्रेम बाजूला राहून जाते. आणि मनात वासना निर्माण होते. त्यामुळे प्रेम आणि वासना यातला फरक ओळखावे, चित्रकार आपल्या चित्रावर प्रेम करतो, बहीण आपल्या भावावर प्रेम करते, ते प्रेम आहे कुठेतरी अनोळखी माणूस भेटून एकमेकांना मोबाईलवर बोलून गोड गोड बोलून, केवड्याचं पान तू , हसल्याने काय छान दिसतेस ?असं बोलून तसेच तूच माझा जीव की प्राण, म्हणून काहीजण फसवे आश्वासन देतात, *काळ बदलला चित्र बदलले. आज तुलाही बदलावं लागणार आहे. कारण तू उमलती कळी आहेस. तुला कोणीही कुस्करून टाकू नये. त्यासाठी तू रणरागिनी बनून रणचंडीकेचं रूप धारण कर, वेळ पडल्यास दुर्गा हो* वासनेच्या बळी पडू नकोस. एवढेच मला सांगायचं आहे. सध्याच्या काळात आपण घर सोडून बाहेर नोकरी करतो यातून मैत्री वाढत जाते,मर्यादेचे उल्लंघन सुद्धा होते, वासना निर्माण होऊन लैंगिकेतेकडे वयानुसार आकर्षण जाते, त्यामधूनच फूस लावून पळून नेले जाते . अशा बातम्या समाज माध्यमात प्रसारित होतात, वयात आलेल्या मुला मुलींनी एकमेकांना अश्लील फोटो दाखवने, ब्लॅकमेलिंग करणे, कुसंगत घडने, पाकीटमनीचा दुरुपयोग करणे, आई-वडिलांनी दिलेल्या पैसा उधळून टाकणे, तेव्हा काहीतरी वाईट घडण्याची दाट शक्यता असते हे सत्य पण कटू आहे , आई-वडिलांपासून दूर असणाऱ्या मुली, वस्तीगृहात, आश्रमामध्ये राहणाऱ्या मुलींच्या बाबतीमध्ये सध्या बरंच ऐकायला मिळते, आई-वडिलांशी मनमोकळे बोला ,त्यांच्या तुमच्यात अंतर ठेवू नका, धीर सोडू नका, काहीही लपवू नका, सत्य सरळ सांगा, जीवन हे अनमोल आहे, देवदासी मुरळी परितक्त्या, घटस्फोटीत महिला मतिमंद मुली, अनाथ मुली यांच्यावर बऱ्याच वेळेस अतिप्रसंग घडतो आणि त्याचे परिणाम नंतर जाणवतात यावरील महिलावर फक्त वासनेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते असे मला वाटते. प्रत्येक समस्येतून मार्ग काढता येतो. म्हणून आपल्या आई-वडिलांना भावांना आपल्याबद्दल काय झालं हे तुम्ही सांगा. वासनाधीन लोकांच्या अमिषाला बळी पडू नका,तू खूप सुंदर दिसतेस हे वाक्य बोलून बरेच जण आपल्या मनात काय आहे ते काढून घेण्याचा प्रयत्न करतात,

किंवा तुझ्यावर माझे खूप प्रेम आहे. असे बोलून त्याच्या मनातून आपल्या मनात येण्याचा प्रयत्न करतात. हे वय पंधरा ते अठरा वर्षाचे असतो. या वर्षात काहीही होऊ शकते, मित्रांचे बोलणं चांगलं वाटतं, कुठे थांबावं हे कळत नाही सुंदर कपडे, आकर्षक मेकअप, केशभूषा ,नटणं, मुरडणं तीन-तीन वेळेस आरशात पाहणं या गोष्टी केल्या जातात, त्यामुळे प्रेमाचे रूपांतर नंतर वासनेत होते, आणि त्याचे मग परिणाम पुढे भोगावे लागतात. मुलींनो समाजामध्ये असं वर्तन करा की कधीच तुम्हाला चारित्र्यावरून कोणी बोलू नये चारित्र्य हे लाख मोलाचे आहे. गेलेली संपत्ती आपण परत मिळू शकतो ;परंतु एकदा गेलेले चारित्र्य परत कधीच मिळवता येत नाही. म्हणून शूरवीर व्हा, हिरकणी , सावित्रीबाई फुले, रमाई आंबेडकर जिजाऊ भोसले, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई सुनीता विल्यम्स. कल्पना चावला यांचे आदर्श तुम्ही पुढे ठेवा यांच्या जीवनावर प्रेम करा तेव्हाच आपल्या मध्ये बदल झाला आहे, असे तुम्हाला या दिनाच्या निमित्ताने सांगायचे आहे.

## व्हॅलेंटाईन्स डे, लिव्ह - इन रिलेशनशिप ; प्रेम की हिंसा ?

आधुनिक केसरी



डॉ. प्रकाश खेत्री,
मुंबई, ७८४३०९२२४४

**प्रिय मित्र-मैत्रिणींनो, देशभरात दोन विषयावर आपण नेहमी चर्चा करतो, एक ‘प्रेम’, दुसरे म्हणजे प्रेमासाठी होणारी ‘हिंसा’ व ‘क्रौर्य’. जगात दरवर्षी 14 फेब्रुवारी हा दिवस “व्हॅलेंटाईन्स डे” म्हणजे “प्रेम दिवस” म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाला खास इतिहास आणि संदर्भ आहे. रोमनमध्ये साधारणत: तिसऱ्या शतकात सम्राट कॅलेडस हा राजा होऊन गेला. प्रेम आणि लग्नामुळे सैनिकांचे लक्ष विचलित होते, अशी त्याची समजूत होती. तेव्हा ‘सैनिकांनी प्रेम आणि लग्नच करू नये’, असा फतवा त्याने काढला होता. या हुकुमशाही व फतव्या विरोधात धर्मगुरू सेंट व्हॅलेंटाईन यांनी बंड केले, 'सैनिकांनो बिनधास्त प्रेम करा' हा संदेश दिला. प्रेमिक सैनिकांची त्यांनी प्रेमविवाह लावून दिले, लोकांचा पाठिंबा मिळत गेला.**

परंतु ही बातमी राजाला कळली, राजाने व्हॅलेंटाईनला तुरूंगात टाकले. व त्याला मृत्यूदंडाची शिक्षा दिली. तेव्हा सेंट व्हॅलेंटाईन यांचा शिरच्छेद केला. तो दिवस होता १४ फेब्रुवारी. सर्वात पहिला ‘व्हॅलेंटाइन डे’ साजरा करण्यात आला तो ४९६ मध्ये. तेव्हा पासून हा दिवस युरोपातील तरुण युगुलांसाठी प्रेमाचे प्रतिक बनला. आज तर या दिवसाला जागतिक स्वरूप प्राप्त झाले आहे. या दिवशी आपल्या आवडत्या व्यक्तीला वा पार्टनरला लोक गुलाब, चॉकलेट, गिफ्ट देऊन प्रेम व्यक्त करतात. प्रपोज करतात. तर भारतासह जगातील हजारो प्रेमीयुगल हा मुहूर्त मानत विवाहबद्ध होत आहेत. जगभर आज ही आपल्याला हीर-रांझा, रोमिओ-ज्युलिएट, लैला-मजनू या जोड्याची व प्रेमवीराची उदाहरणे दिली जातात. मानवी प्रेमभावनेवर कित्येक प्रेमकाव्ये, प्रेमपत्रे, नाटके, चित्रपट, कथा, मालिका जगात लिहिली गेली, स्मारके उभी राहिली. प्रेमासाठी अनेक हत्या-आत्महत्या झाल्या, एकतर्फी प्रेमातून खूनाचे प्रकार देशात वारंवार घडत आहेत. मुलींनी प्रेमाला नकार दिला तर प्रेम करणारा तरुण हिंसेकडे वळतो आहे, तरुणानं मध्ये नकार पचवण्याची क्षमता आणि मानसिकता राहिली नाही. तो तरुणीला आयुष्यातून संपवण्याची भाषा बोलतो. प्रेमासाठी मुलींना जिवंत जाळले जाते, भर रस्त्यात खून केले गेले, दिवसा ढवळ्या गोळ्या मारल्या जातात, रस्त्यावर चाकू हल्ला होत आहेत. अशा एक ना अनेक घटना रोज घडताना दिसत आहेत. या सर्व बाबी निकोप समाजासाठी अपायकारक आहेत. विशिष्ट वयात एकमेकांविषयी आकर्षण वाटणे हे नैसर्गिक आणि स्वाभाविक बाब असते, आकर्षण म्हणजे प्रेम नाही. प्रेम आंधळ असता कामा नये, ते डोळस आणि विवेकी असल पाहिजे. आकर्षण, प्रेम आणि विवाह या बाबी भिन्न आहेत. हे तरुणांनी समजून घ्यायला हवे, तेव्हाच प्रेमासाठी हिंसेचे कृत्य घडणार नाही. पुरुषत्व म्हणजे स्त्रीयांवर सर्वंकष नियंत्रण प्रस्थापित करणे, ही पुरुषत्त्वाची संकल्पना आणि कल्पना बदलणे आज गरजेचे आहे. स्त्रियांनाही भाव-भावना, आवडी-निवडी विचार,मते असतात. तेव्हा स्त्रीकडे माणूस म्हणून बघितले पाहिजे. विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था या भक्कम टिकल्या पाहिजेत, यासाठी प्रयत्न करायला हवेत, उलट आज समाजामध्ये 'लव्ह इन रिलेशनशिप' यासारख्या पाश्चात्त्य प्रथांचे अनुकरण केले जात आहे.२१ व्या शतकात काही तरूण परस्पर ओळख किंवा प्रेमानंतरचा दुसरा टप्पा ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’ हा मानत आहेत. लिव्ह-इन रिलेशनशिपचे नाते नैतिक की अनैतिक या बाबतही भारतात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. परंतू अलाहाबाद हायकोर्टाने लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत असलेल्या एका जोडप्यानं केलेली संरक्षण देण्याची मागणी योग्य असल्याचं म्हटलं आहे. "संविधानाच्या कलम २१ अंतर्गत, “राइट टू लाइफ” च्या श्रेणीत ते येत असल्याचं कोर्टानं म्हटलं आहे. तेव्हा "लिव्ह-इन रिलेशनशिपला सामाजिक किंवा नैतिक बाबींच्या आधारे नव्हे, तर वैयक्तिक स्वातंत्र्य (पर्सनल ऑटोनोमी) च्या दृष्टीनं बघणं गरजेचं आहे, असं कोर्टानं निर्णयात स्पष्ट केलं. तेव्हा सुप्रीम कोर्टानं एखादं अविवाहित असलेलं जोडपं तरुण तरुणी किंवा कोणतेही दोन लोक परस्पर संमतीने एकत्र राहू शकतात. भारतीय कायद्यात ते पूर्णपणे कायदेशीर आहे. भारतीय कायदा याला बेकायदेशीर मानत नाही. असे नमूद केले आहे. परंतू भारतात या नातेसंबंधाला समाजमान्यता नाही, पाश्चात्य देशात मात्र शहरी भागात निम्म्यापेक्षा अधिक जोडपी अशीच लिव्ह-इन मध्ये दीर्घकाळ सोबत राहतात. लिव्ह-इन रिलेशनशिप अर्थातच संभाव्य पार्टनरच्या सहमतीने **क्रमशः**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वनराई फुलविणारे पद्मविभूषण डॉ.मोहन धारिया

आधुनिक केसरी

*लोणंदः वनराई' संस्थेचे संस्थापक,खासदार,केंद्रीय मंत्री,नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष व स्वातंत्र्यसैनिक म्हणून स्वर्गीय डॉ.मोहन धारिया यांनी त्यांच्या आयुष्यातील जवळपास ७० वर्षे सेवा फक्त आणि फक्त लोकांच्या सेवेसाठी केली. जनतेची कामे करता करता सामाजिक बांधिलकी सोबतच निसर्ग हीच खरी संपत्ती मानून काम करणारे स्व.मोहन धारिया आजही लोकांच्या मनात आहेत.त्यांचे सुपुत्र रवींद्र धारिया त्यांच्याच कार्याचा वारसा पुढे घेऊन निघालेले आहेत.डॉ.मोहन धारिया यांच्या जयंती निमित्त त्यांचे स्मरण करत असताना त्यांनी केलेले कार्य हे किती महत्वाचे आहे.हे नव तरुणांना व पुढच्या पिढीला सुद्धा समजणे आवश्यक वाटते.१४ फेब्रुवारी हा डॉ.मोहन धारिया यांचा जयंती दिवस असून त्यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण वनराई परिवारालाच नव्हे तर जनतेला सुद्धा एक प्रेरणादायी दिवस म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाची आठवण होणारा हा दिवस आहे.*

डॉ.मोहन धारिया यांनी त्यांच्या आयुष्यात पर्यावरणाच्या दृष्टीने अनमोल असे कार्य केले.त्याच कार्याची समाजाला नितांत गरज भासत आहे.डॉ.मोहन धारिया हे राजकारणात तर होतेच शिवाय राजकारणा सोबतच त्यांनी सामाजिक कार्यात तसेच स्वातंत्र्य लढयात सुद्धा मोठे योगदान दिलेले आहे.स्वातंत्र्य,समता,बंधुभाव,लोकशाही, धर्मनिरपेक्षता,समाजवाद आणि राष्ट्रीय एकात्मता या नीतीमूल्यांवर आधारित




विचारधारेतून आणि ठाम भूमिकेतून त्यांनी राष्ट्रीय राजकारणात आपला वेगळा ठसा उमटविलेले व्यक्तिमत्व म्हणून डॉ.मोहन धारिया यांच्याकडे पाहिले जाते. लोकांकडून ही त्यांच्या कार्याचे कौतुक होत असते .त्यांनी वनराईची निर्मिती केली.ही निर्मिती खूप महत्वाची बनली.त्यांनी पर्यावरण आणि वृक्षसंवर्धना बाबतचं केलेलं कार्य आजही आजरामर आहे.वनराई सह विविध स्वयंसेवी संस्था-संघटनांच्या माध्यमातून जलसंधारण, वनीकरण,पर्यावरण,ग्रामीण विकास इत्यादी क्षेत्रांत मूलभूत योगदान दिले. या क्षेत्रांतील अनेक शासकीय धोरणांचे ते शिल्पकार ठरले.अनेक समाजोपयोगी कार्य त्यांच्या हातून घडत गेले. शेतकऱ्यांना रोपे वाटप करणे,वनराई बंधारे बांधणे, यांसारखी अनेक महत्वपूर्ण कार्य त्यांनी केली. वनराई ही केवळ संस्था नसून भारताला सुजलाम आणि सुफलाम बनवणाऱ्या लोकांची चळवळ आहे.असे त्यांचे म्हणणे असायचे.आज गावा गावात वनराईचे नाव पोहचलेले आहे.याचे संपूर्ण योगदान हे डॉ.मोहन धारिया यांना जाते. आजही त्यांच्या पश्चात वनराई आपल्या देशाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे.अनेक गावा गावातून वनराई संस्थेचे कार्य सुरू आहे.डॉ.मोहन धारिया यांचे कार्य आणि त्यांचा विचार पुढे घेऊन जाण्याचे काम आज सुद्धा वनराई अधिक जोमाने करत आहे.हा आदर्श डॉ.मोहन धारिया यांच्या कार्यातून पुढे पुढे येत आहे.१९८३ च्या आसपास वनराईची निर्मिती झाली असली तरी आजही या संस्थेचे कार्य सुरू आहे. अनेक ठिकाणी तलावांचे खोलीकरण केले जाते आहे.अनेक ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतली जात आहेत. पाणी हा मानवी जीवनाचा महत्वाचा स्त्रोत आहे.हा स्रोत चिरकाल पर्यंत टिकून राहावा.तसेच दुष्काळ जन्य परिस्थिती दूर हटावी.यासाठी विशेष प्रयत्न हे वनराई संस्थेकडून केले जात आहेत.वनराईच्या माध्यमातून डॉ.मोहन धारिया यांनी देशाला सुजलाम सुफलाम करणारी चळवळ कृतीत आणल्याने ही चळवळ अनेक पर्यावरण प्रेमींना प्रेरक बनलेली आहे.अनेक लोकं या कार्यास जोडली गेलेली आहे.डॉ.मोहन धारिया हे पर्यावरण प्रेमी तर होतेच शिवाय ते एक थोर देश प्रेमी सुद्धा होते. वयाच्या १६ व्या वर्षी १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात त्यांचा सहभाग होता.ब्रिटिशांच्या विरोधात लढताना त्यांची देशभक्ती दिसून येते. देशभक्ती सोबतच पर्यावरण आणि झाडांवर प्रचंड प्रेम करणारे असे व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ.मोहन धारिया यांच्याकडे पाहिले जाते.गावा गावात लोकांच्या हिताचे कार्य करणाऱ्या डॉ.मोहन धारिया यांनी त्यांच्या कार्याने लोकांच्या जीवनात वनराई फुलविली.त्यांच्या या महत्त्वपूर्ण कार्याची दखल म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.पर्यावरण आणि वृक्षसंवर्धन या कार्याबद्दल लोकांनी डॉ.मोहन धारिया यांच्या कार्याचा आदर्श घेत कार्य हाती घेतल्यास नक्कीच सगळीकडे हिरवळ झालेली पाहायला मिळेल.



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

वनराई च्या माध्यमातून डॉ.मोहन धारिया यांनी केलेले कार्य हे आपल्या देशालाच नव्हे तर जगाला दिशा देणारे आहे.वृक्ष संवर्धन,पाणी,पर्यावरण याबाबत कसे कृतीशील कार्य करणे गरजेचे आहे.हे त्यांनी वनराईच्या कार्यातून दाखवून दिलेले आहे.

# निसर्ग वसंत लोककवी संत तुकोबाराय

आधुनिक केसरी

महापुरुषांची जयंती ही त्यांच्या जन्मानंतर येणाऱ्या अनंत काळाला आपल्या अलौकिक कर्तृत्वाने ललामभूत करत असते! ते येतात, पाहतात आणि आपल्या दिव्य कर्मांनी काळ उर्जायमान करून जातात! आत्तापर्यंत जगात अनेकविध महामानव जन्माला आले आणि तुम्हा-आम्हाला सन्मार्ग दाखवून गेले. साधारणतः या सर्वच महामानवांनी कोत्याही गोष्टींचा संग्रह केला नाही आणि जातांना जगाला लोककल्याणाचा महामंत्र देऊन गेले. असेच एक महापुरुष, लोककवी, ज्ञान, भक्ती, वैराग्य, त्याग, भजन, अभंग-लेखन इत्यादी गुणांनी ओतप्रोत असलेले महान व्यक्तिमत्व म्हणजे जगद्गुरू संत तुकाराम! लौकिकार्थाने तुकोबांची आज जयंती! आजचा तुकाराम जयंतीचा दिवस म्हणजेच दुसरीकडे निसर्गात येणारा वसंत पंचमीचा आनंदोत्सव! माघ महिन्याच्या पाचव्या दिवशी साजरा होणारा हा निसर्ग उत्सव म्हणजे वसंत पंचमी! याच दिवशी माता कनकाई आणि पिता बोल्होबा यांच्या घरी तुकारामाचा जन्म झाला. आपण कधी जन्माला यावे आणि कधी मरावे हे आपल्या नियंत्रणात जरी नसले तरी आपण जन्माला येतांना काहीतरी प्रतीकात्मक घटना किंवा दिवस असणे हे महत्वाचे द्योतक असले पाहिजे. श्रीकृष्ण बंदिवासात आणि संबोधि भगवान गौतम बुद्ध वृक्षवेलीच्या सानिध्यात जन्मले. नक्कीच हे प्रतीकात्मक आहे. याच जोडीने संत तुकाराम हे निसर्ग उत्सवाच्या प्रसंगी जन्मले.



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

वसंत पंचमी म्हणजे निसर्गात होणारे आनंददायी बदल! जुनी पाने गळून नवीन पालवी फुटण्याचा म्हणजेच वृक्षवेलींच्या पुर्जनामाचा उत्तुंग काळ! झाडाला पालवी फुटते, त्याच न्यायाने मानवाला सुद्धा नवविचारांची पालवी फुटणे अपेक्षित आहे. बरोबर एक महिना अगोदर प्रारंभ झालेला उत्तरायण, सूर्याने केलेला मकर राशीतील प्रवेश आणि त्यानंतर होणारे सृष्टीतील आनंददायी बदल हे अनेक दृष्टीने अनेक बाबींचे प्रतिक आहे. संक्रांतिनंतर हळूहळू निसर्गचक्र बदलायला लागते. त्याच्या जोडीने माणसाला आपले जीवनचक्र सुद्धा बदलून घेणे गरजेचे आहे.

आजपासून ज्याप्रमाणे झाडांना पालवी फुटते त्याचप्रमाणे माणसाने बुद्धी, ज्ञान, विज्ञान, कला, संगीत इत्यादी प्रकारचे ज्ञानार्जन प्रारंभ करायला हवे याचे सर्वोच्च प्रतिक म्हणजे वसंत पंचमी! ज्याप्रमाणे वसंत बाहेर फुलतो तसाच तो आतही फुलावा! वसंतोत्सव हा निसर्गाचा उत्सव आहे. वसंत पंचमीपासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत तो साजरा करतात. निखालस सुंदर भासणारा निसर्ग वसंत ऋतूत अक्षरशः सोळा कलांनी फुलून येतो. वसंत ऋतूच्या आगमना प्रीत्यर्थ सुवसंतक, वसंतोत्सव, मदनोत्सव, अशोकोत्सव असे विविध उत्सव साजरा करण्याची प्रथा प्राचीन काळापासून सुरू आहे. वाल्ड्न नावाच्या जगप्रसिद्ध ग्रंथाचा लेखक हेन्री डेविड थोरो, "वसंत ऋतू! माणसाच्या मनातील कढ आणि पृथ्वीवरील बर्फ वितळण्याची सुरुवात होणारा काळ. झाडांच्या नसा आता हळूहळू मोकळ्या झाल्या आणि मग सगळीकडे उतू गेली जगण्याची तीव्र इच्छा!" असे लिहून वसंताचा गौरव करतो. त्यामुळे वसंतोत्सव हे महान आशावादाचे ओजस्वी प्रतीक आहे. वसंत म्हणजे आशा व सिद्धी यांचा सुंदर मिलाफ! वसंत म्हणजे कल्पना व वास्तवता यांचा सुरम्य, आनंदी समन्वय! महाकाव्य रामायणात वाल्मिकींनी वसंत ऋतूचे सुंदर, मनोहारी, विलोभनीय ऋतू असे वर्णन केले आहे. श्रीमद् भगवद्गीतेत श्रीकृष्णाने या ऋतूला कुसुमाकर संबोधून हा ऋतू म्हणजे ऋतुराज आहे अशी बिरुदावली गायली आहे. अखंड प्रेमाची उधळण करणारा, आकर्षक वाटणारा निसर्ग वसंत ऋतमध्ये आणखीनच मोठा मनोहारी, लोभस बनतो. वृक्षलतांना नवी पालवी फुटते आणि संपूर्ण सृष्टी पानाफुलांनी तारुण्यात येते. निसर्गातील या आनंददायी, बदलत्या स्वरुपामुळे स्वभाविपणे मनुष्याची मनोवृत्तीही उत्साही व आनंदी होते.

त्यामुळेच हा उत्सव म्हणजे मानवी जीवनातील संक्रमणस्थितीचा अप्रतिम द्योतक आहे! एकीकडे एवढा आनंददायी वसंत फुललेला असतांना दुसरीकडे महाराष्ट्राच्या क्रांतिकारी सृजन क्षिताजावर तुकाराम नावाचा नवा वसंतोदय झाला! अगोदरच सृष्टी फुललेली असतांना तिला बाळ तुकाराम जन्माने नवा मनोहरी मोहर प्राप्त झाला! सृष्टी आणखीनच सुगंधून गेली. आनंद, सुगंध, मोहर अक्षरशः ओसंडून वहायला लागला! सगळीकडे पाने, फुले, शेते, नद्या, ओहळ आणि डोंगर प्रफुल्लीत झाले! बहरून आले! निसर्गातील होणारी ही सुंदर, अलौकिक क्रांती तुकोबांच्या रूपाने कनकाई-बोल्होबा महाराजांच्या घरी पाळण्यात झुलत होती. तुकोबांच्या जीवनाच्या प्रारंभी जणू आनंदाची निसर्ग उधळण होत होती. बालपण भजन-कीर्तनाच्या सानिध्यात गेले. हळूहळू परिस्थिती बदलत गेली. एका मागोमाग आई-वडिलांचे निधन झाले. वयाच्या सोळाव्या-सतराव्या वर्षी तुकोबांच्या खांद्यावर संसाराचे जू येऊन पडले. त्यात दोन बायका! अनंत संसारिक अडचणींचा डोंगर उभा असतांना आपला भाऊ तरी आपली साथ देईल असे वाटतांना एक भाऊ निघून गेला तर दुसरा वेगळे निघाला! संकटांची मालिका थांबायला तयार नव्हती. दुसरीकडे शेतातील वडिलोपार्जित श्री विठ्ठल-रुक्मिणीचे मंदिर तुकोबांची वाट पहात होते. त्याला आणखी दुष्काळाची जोड मिळाली! सगळीकडे संकटांचे पहाडच पहाड! त्यात तुकोबा अभंग लिहायला लागले! भजन-कीर्तन करायला लागले! याचा परिपाक तुकोबा क्षुद्र आहे म्हणून धर्म मार्तंड पाठीशी लागले. काय करावे? कुणाकडे जावे? सर्वत्र सैरभैर झालेले तुकोबा! कधी भंडारा तर कधी भामनाथाच्या डोंगरावर जाऊन एकटेच एकतारी घेऊन अहोरात्र भजन करू लागले.

***वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षी ही सुस्वरें आळविती ।***
***येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाही गुण दोष अंगा येत।***
***आकाश मंडप पृथ्वी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ।***
***कंथाकुमंडलु देह उपचारा । जाणवितो वारा अवसरु ।***
***हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ।***
***तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांसी।***

असे अलौकिक, विनवणी, करणारे अभंग गाऊ लागले. असे निसर्गपूजनाचे अनेक अभंग लिहून तुकोबांनी मानवी उत्कर्षाच्या मूलस्थानी असणाऱ्या निसर्गाचे वेळोवेळी ऋण व्यक्त केले आहे. तुकोबा स्वतःच वसंत पंचमीला जन्मले असल्यामुळे त्यांच्या जीवनात शब्दांचा वसंत आनंदोत्सव साजरा झाला.

# 'दत्तक पिता' नाशिकवर मेहेरबान

आधुनिक केसरी

*मी नाशिकला दत्तक घेतो आहे, अशी घोषणा 2019 मध्ये करणारे तेव्हाचे मुख्यमंत्री आणि आजचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस हे सध्या नाशिक महानगरावर भलतेच मेहरबान झाले आहेत. नुकताच त्यांनी नाशिकचा दौरा करून विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण केले. याप्रसंगी त्यांनी नाशिककरांना विश्वास दिला की येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कुठलाही निधी कमी पडून देणार नाही. गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने व संबंधित अधिकारी, पदाधिकाऱ्यांनी आत्तापासूनच कामाला लागून 2027चा सिंहस्थ कुंभमेळा आराखडा तयार करून त्याप्रमाणे राज्य शिखर समितीच्या मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठवावा म्हणजे जुलैमधील अर्थसंकल्पातच त्याची तरतूद करता येईल.सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्रास एका आगळे वेगळे महत्त्व असून या दोन्हीही तीर्थक्षेत्रांच्या चेहरामोहऱ्यात बदल घडेल असा आराखडा सादर करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.*

येत्या लोकसभा विधानसभा आणि तदनंतर होणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीवर डोळा ठेवून सध्या सर्वच राजकीय पक्ष कामास लागले आहेत. नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांच्या प्रयत्नातून साकार झालेले राज्यातील पहिले वातानुकूलित बसस्थानक आणि आमदार सीमा हिरे यांच्या आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या अद्ययावत सातपूर पोलीस ठाण्याच्या लोकार्पणासाठी उपमुख्यमंत्री नाशिक मध्ये आले होते याच दौऱ्यात त्यांनी शहरातील एका भव्य नाट्यगृहाचे उद्घाटन केले आणि जलयुक्त शिवार अभियान आणि विविध छोट्या-मोठ्या विकास कामांचा शुभारंभ,लोकार्पण व भूमिपूजनही केले . येत्या लोकसभा निवडणुकीनंतर नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान बनवण्याचा संकल्पच देशातील संपूर्ण भाजपाने केला आहे



बाजीराव सोनवणे

आणि या दृष्टीने महाराष्ट्र खूप महत्त्वाचा आहे. सध्या तरी लोकसभा निवडणुकीवर भाजपने लक्ष केंद्रित केलेले आहे. महायुतीतील आपल्या सहकारी असलेल्या शिवसेना व राष्ट्रवादीच्या मदतीने जास्तीत जास्त खासदार दिल्लीत पाठविण्याचा संकल्पच फडणवीस यांनी केलेला दिसतो.नाशिकचे सध्याचे खासदार हेमंत गोडसे हे शिंदे शिवसेनेचे असून नाशिक जिल्ह्यातील बराचसा भाग ज्या धुळे मतदार संघात जोडला गेलेला आहे तो धुळे मतदार संघ सध्या डॉक्टर सुभाष भामरे यांच्या माध्यमातून भाजपकडे आहे. नाशिक जिल्ह्याचा विचार करता सध्या नाशिक जिल्ह्यातील राजकीय वातावरण भाजप आणि मित्र पक्षांना खूपच अनुकूल आहे. काँग्रेसचे इगतपुरी चे आमदार हिरामण खोसकर वगळता सध्या सर्व आमदार महायुतीकडे आहेत आणि दोन्ही खासदार ही महायुतीकडे आहेत.






महाविकास आघाडीकडे असलेले एकमेव आमदार हिरामण खोसकर हे सध्या काँग्रेसमध्ये जरी असले तरी ते मनानेच कायम अजितदादा पवार व महायुतीकडेच आहेत. त्यांना अशोकराव चव्हाण यांच्या निमित्ताने आता संधी चालूनच आलेली आहे. सध्या केनिया दौऱ्यावर असलेले खोसकर भारतात परतताच ते अशोक चव्हाण यांच्या मार्गाने जाणार आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळते. संपूर्ण नाशिक जिल्हा फडवणीस, पवार,शिंदे यांच्या पाठीशी उभा राहिलेला दिसतो आहे.शरद पवार साहेबांनंतर सर्वात मोठा राजकीय मल्ल म्हणून उदयास आलेले फडणवीस या परिस्थितीचा फायदा घेणार नाही तरच नवल आहे. जिल्ह्यातील दोन्ही खासदार आपल्या विचारसरणीचे आणि तदनंतर जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचा फडणवीस यांनी चंगच बांधला आहे. त्यासाठीच त्यांचे नाशिक दौरे वाढलेले आहेत. नुकत्याच झालेल्या त्यांच्या या दौऱ्यात त्यांनी भाजप सह मित्र पक्षांच्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढविण्याचा पूर्णपणे प्रयत्न केलेला आहे.

# अशोकवनात कमळाची लागवड होणार..!

## भोकरला राजकीय समीकरण बदलणार

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी गेली अनेक दशक काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहून आपली राजकीय कारकीर्द यशोशिखरावर नेली. असा दिग्गज लोकनेता अचानक मंगळवारी (ता.१३) काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन भाजपात पक्ष प्रवेश केल्याने राजकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.भोकर विधानसभा मतदारसंघाचे विद्दमान आमदार असुन त्याच्या निर्णयाने मतदार संघातील राजकीय समीकरण बदलणार आहे. अशोक वनातील "हाताने "आता "कमळाची "लागवड केली जाणार आसल्याने येणा-या काळात "कमळ" कीती फूलणार आहे हे पाहण औत्सुक्याच ठरणार आहे. भोकर विधानसभा मतदारसंघ संघाची फेररचना होताच काँग्रेस पक्षाचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मतदारसंघाची चाचपणी केली आणि केंद्रीय गृहमंत्री (कै.) शंकरराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल भोकर विधानसभा मतदारसंघातुन झाली असून त्यांना मानणारा मतदार असुन त्यांचे राहिलेले अधूरे स्वप्न पुर्ण करण्याची संधी मिळेल



याचीमनी खुणगाठ बांधून भोकर मतदार संघाची निवड केली.आणि अशोक चव्हाण हे सर्वाधिक मताधिक्यानी विजयी झाले. येथील मतदार संघातून विजयी झालेल्या बहुतांश उमेदवारांना मंत्रिपदाची "लॉटरी" लागते अशी परंपरा आहे.अशोक चव्हाणांना देखील त्याचा लाभ झाला.सूदैवाने आदर्श घोटाळ्यात अडकल्याने त्यांना मुख्यमंत्री पदावरून पायउतार व्हावे लागले. योगायोगाने पून्हा ते सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून संधी मिळाली.राज्यात भाजपानी मोठ्या शिताफीने सत्ता परिवर्तन केल अन् चव्हाणाच मंत्री पद गेल. केद्रांत आणि राज्यात भाजपाची सत्ता आल्यानंतर अनेकांची "ईडी" मुळे भंबेरी उडाली. यातून सहिसलामत बाहेर पडायच असेल तर "भाजपाशी" होण हाच एकमेव प्रर्याय होता.परिणामी अनेक दिग्गज नेते मंडळींनी जेल पेक्षा भाजपात जाण पसंत केल.त्याच धास्तीने अशोक चव्हाण यांनी ज्या काँग्रेस पक्षानी मोठ केलं त्यापक्षाला मोठ्या जड अंतःकरणानी नाईलाजास्तव मंगळवारी (ता.१३)आखेरचा रामराम ठोकावा लागला.आज त्यांचा मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अधिकृतरित्या भाजपात प्रवेश केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे भोकर विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरण बदलणार आहे हे मात्र निश्चित आहे.

**अशोक वनात कमळ फूलणार :** भोकर विधानसभा मतदारसंघ हा प्रारंभी पासून काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता . आता अशोक चव्हाण यांच्या भाजपा प्रवेशाने राजकीय समीकरण बदलणार आहे . भोकर, मूदखेड, अर्धापूर हे तीन तालुके मतदार संघातील असुन येथील मतदार त्यांची "ओटबॅंक " आहे .त्याशिवाय त्यांचा नांदेड व मराठवाड्यात चांगला जनसंपर्क असुन ते या भागाचे लोकनेते म्हणून ओळख आहे .त्यामूळे पक्षासाठी ते लाभदायक ठरू शकते .दूसरीकडे पदाधिकारी व कार्यकर्ते, नेते मंडळी आणि मतदार त्यांच्या निर्णयाचा स्विकार करतील काय हे पाहण औत्सुक्याच ठरणार आहे .दलीत, मुस्लिम मतदार हा भाजपा विरोधात काम करते आहे त्याचं मतपरिवर्तन करण्यासाठी चव्हाणांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे .अशोक वनात "कमळाची "लागवड होणार हे निश्चित झाल्याने मतदार त्यास कीती प्रमाणात "खतपाणी" घालतील यावर पुढील राजकीय भवितव्य अवलंबून आहे .

# दुष्काळी मदत लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात

## त्रूटी दुरुस्त करून घेण्याचे आ. झनक यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** यावर्षीच्या सुरुवातीलाच अल्पवृष्टी आणि त्या नंतर झालेल्या अवकाळी पावसामुळे तुरीचे व हरभरा पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. परिणामी शेतकऱ्यांकडून दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीने जोर धरला होता. त्या अनुषंगाने प्रशासनाने सर्व्हे करुन सरसकट मदत जाहीर केली होती. सदर मदतीचा निधी उपलब्ध झाला असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. शासनाने प्रकाशित केलेल्या यादीत ज्या शेतकऱ्यांचे नावे नाहीत अशा शेतकऱ्यांनी त्रुटी दुरुस्त करून घेण्याचे आवाहन रिसोडचे आ. अमित झनक यांनी केले आहे.

अवकाळी पावसामुळे तुरीचे अतोनात नुकसान तर, झालेच आहे पण त्याच बरोबर बहुतांश शेतकऱ्यांना हरभऱ्याच्या शेतात नांगर फिरवून दुबार पेरणी करावी लागली आहे. दुबार पेरणीला खुप उशीर झाल्यामुळे हरभरा पीक येणार नाही असा अनुभव असलेल्या शेतकऱ्यांनी गहू पेरण्याला पसंती दिली आहे. मात्र मध्यंतरी आलेल्या ढगाळ वातावरणामुळे काही भागात दाट धुके पडले होते. सदर भागातील गव्हाचे पीक सुद्धा जेमतेमच आहे. शासनाने शेतकऱ्यांना मदतीचा आधार द्यावा अशी मागणी रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघाचे आ. अमित झनक यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या मागणीला शासनाकडून सुद्धा प्रतिसाद मिळाला आहे. त्या अनुषंगाने लवकरच नुकसाभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. खरिप हंगामातील सोयाबीन पिकात बहुतांश आंतरपीक म्हणून तुरीची पेरणी करतात. पट्टापद्धतीने आंतरपिकाची पेरणी होत असल्याकारणाने एक हेक्टर सोयाबीन पिकामधील केवळ अर्धा एकर (२०) गुंठे तुरीचे क्षेत्र धरण्यात येते. मात्र एकूण एक हेक्टर क्षेत्रात तूर निघेपर्यंत संबंधीत शेतकऱ्यांना दुसरे पीक पेरता येत नाही हे विशेष लक्षात घेऊन तुरीचे क्षेत्र धरण्यात यावे अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. त्यामुळे हेक्टरी मिळणारी मदत जर गुंठयाच्या क्षेत्रफळात मिळणार असेल तर ती खुप तुटपुंजी ठरेल असे असे अनेक शेतकरी बोलत आहेत. परिणामी तूर पिकाच्या क्षेत्रफळाची संभ्रमावस्था मदत हातात येईपर्यंत कायम राहणार आहे.



अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचा मदत शासनाने जाहीर केली असून, युद्ध पातळीवर याद्या बनविणे सुरु आहे . ज्या शेतकऱ्यांचे आधार नंबर लिंक नसतील अथवा बँक खाते नंबर दिला नसेल अशा शेतकऱ्यांनी संबंधीत तलाठ्याकडे नोंद करून घ्यावी .

**प्रतिक्षा तेजनकर, ( तहसिलदार, रिसोड )**



नुकसाभरपाई मदत याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत . मात्र सदर याद्यात बऱ्याच शेतकऱ्यांचे नावे नसल्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी येत आहेत . ही मदत सरसकट असल्यामूळे सर्वांना मिळणार आहे . त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे नाव यादीत नसेल त्यांनी संबंधितांकडे जावून त्रुटी दुरुस्त करून घ्यावी .

**आ . अमित झनक, ( रिसोड मालेगाव विधानसभा )**



# साईभक्त भाविकांची मंदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबांच्या हयातीत ज्या मार्गावरून साईबाबा स्वत चाललेले होते त्या शिव रस्यावर शिर्डीतुन खंडोबा मंदिराजवळ रथाचे पुजन करून परीक्रमेला सुरुवात करण्यात आली यावेळी ना दिपक केसरकर मठाधिपती रामगिरी महाराज काशिकानंद महाराज वरिष्ठ पोलीस आधिकारी संदिप मिटके आदींसह विविध मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आली निघालेल्या या परीक्रमेत लाखभर साईभक्त शिर्डी ग्रामस्थ आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते. शिर्डी येथे ह साथीचा आजार आला होता. त्यावेळी स्वतःच्या हाताने पिठ ज्या शिवेवर साईबाबांनी बाबांनी टाकले होते त्याच मार्गावरून हि १४ किलोमीटर निघोज शिर्डी बन राहता विरभद्र मंदिर साकुरी आदी ठिकाणी याच मार्गावरून मार्गस्थ झाली. साईबाबांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या या शिव मार्गावर परिक्रमा केल्यास अनेक साईभक्तांना ऊर्जा अनुभूती व मोठी मनशांती मिळाल्याचा अनुभव साईभक्तांना गेल्या चार वर्षात आलेले असल्याने मोठ्या प्रमाणात साईभक्त परराज्यातील आलेले होते साई परिक्रमेचे ही पाचवे वर्ष असून ग्रीन इन क्लीन शिर्डी फाउंडेशन शिर्डी नगरपरिषद व शिर्डी ग्रामस्थ यांच्या सहकार्याने शिर्डीत परिक्रमेचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवार दिनांक १३ फेब्रुवारी परिक्रमा महोत्सवाचे पाचवे वर्ष आज पुर्ण झाले आहे. या परिक्रमेसाठी देशभरातून साईभक्त मोठ्या संख्येने येत असतात या परिक्रमा महोत्सवाचे महत्त्व दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे, अशा या परिक्रमेसाठी देशभरातील साईभक्त शिर्डी या ठिकाणी येऊन आपले हजेरी लावत असतात हा परिक्रमा महोत्सव यशस्वी करण्यात शिर्डी ग्रामस्थ व ग्रीन इन क्लीन शिर्डी फाउंडेशन चे सर्व सदस्य सामाजिक कार्य एक विचाराने प्रयत्न केले या मिरवणुकीत विविध चित्ररथ साई नामाचा गजर करीत सहभागी झाले होते.

# अमरावतीचा विजय ठरला आमदार श्रीचा मानकरी

## अकोल्याच्या शेख सलिमने पटकावला बेस्ट पोझर ऑफ विदर्भचा मान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. दरम्यान डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस स्पोर्ट्स असोसिएशन चंद्रपूर यांच्या सहकार्याने चंद्रपूर महानगरपालिका पटांगणावर पार पडलेल्या भव्य विदर्भ राज्यस्तरीय बॉडी बिल्डींग अंजिक्यपद स्पर्धेत अमरावतीचा विजय भोयर आमदार श्री चा मानकरी ठरला आहे तर अकोल्याच्या शेख सलिमने बेस्ट पोझर ऑफ विदर्भचा मान मिळविला आहे. यवतमाळच्या महोम्मद शहजाद यांना बेस्ट इम्प्रुव्हड ऑफ ईअर चा पूरस्कार मिळाला आहे. मान्यवरांच्या हस्ते सर्व विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरित करण्यात आले. यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे, माजी नगर सेवक पप्पू देशमूख, सुर्यकांत खनके, माता महाकाली महोत्सव समीतीचे कोषाध्यक्ष पवन सराफ, डॉ. अशोक वासलवार, सुभाष बोमिडवार, अजय वैरागडे, श्याम धोपटे, आदींची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती

सदर स्पर्धा 55, 60, 65, 70, 75 आणि खुला अशा सहा गटात घेण्यात आली. यात 55 वजन गटात चंद्रपूरचा सुरज तिवाडे, 60 किलो वजन गटात बुलढाणाचा दत्तात्रय सावरकर, 65 किलो वजन गटात मोहमद सहजाद, 70 किलो वजन गटात शेख सलिम, 75 किलो वजन गटात अकोल्याचा साहेब साहिल तर खुल्या गटात अमरावतीचा विजय भोयर प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. या स्पर्धेत चंद्रपूरच्या बॉडी बिल्डरनेही घवघवीत यश प्राप्त केले आहे. यात चंद्रपूरच्या शिवाजी वाकोडे याने 55 वजन गटात तिसरा क्रमांक, संकेश भगत पाचवा क्रमांक, 65 किलो वजन गटात शीव कुमार चौहान यांनी 5 वा क्रमांक, 70 किलो वजन गटात शुभम उराडे याने 5 क्रमांक पटवीला आहे. यावेळी आमदार श्री ठरलेल्या विजय भोयर यांना 51 हजार 111 रुपये व ट्रॉफी, बेस्ट पोझर ठरलेल्या शेख सलिम याला 31 हजार 111 रुपये ट्रॉफी आणि बेस्ट इम्प्रुव्हसाठी महोम्मद शहजाद याला 21 हजर 111 रुपये आणि ट्रॉफी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे यांनी स्टेज शो करत कार्यक्रमात रंगत भरली. त्यांचा शो पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

चंद्रपूर, अमरावती, अकोला, बुलढाना, वासिम, वर्धा, यवतमाळ, नागपूर येथील जवळपास 70 स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यावेळी चंद्रपूरचे दिलिप शेंगारप, नागपूरचे अरुन देशपांडे , वेनु गोपाल, अकोल्याचे संजय देशमूख , चंद्रपूरचे नरेंद्र भुते , दिलीप करकाडे, नागपूरचे चंद्रशेखर वनकर, चंद्रपूरचे शेख साजित, पन्नालाल बहोरिया आदींनी पंच म्हणून उत्तम गामगिरी बजावीली. या आयोजनाच्या यशस्वीतेसाठी यंग चांदा ब्रिगेडचे प्रसिध्दी प्रमूख नकुल वासमवार, अल्पसंख्याक विभागाचे युथ शहर अध्यक्ष राशेद हुसेन, शहर संघटक राम जंगम, नितेश गवळी, कार्तिक बोरेवार आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन नासिर खान यांनी केले.




**बॉडी बिल्डग क्षेत्रात चंद्रपूरचे नाव गौरवांकीत करा – आ . किशोर जोरगेवार**

श्री माता महाकाली क्रिडा महोत्वाच्या माध्यमातून आपण चंद्रपूरातील बॉडी बिल्डरांना मोठे मंच उपलब्ध करुन देत आहोत . यात प्रसिध्द बॉडी बिल्डरांना आपण आमंत्रीत करुन येथील बॉडी बिल्डरांना प्रोत्साहीत करण्याचे काम करत आहोत . यंदा हे तिसरे वर्ष असून दरवर्षी यात स्पर्धकांचा सहभाग वाढत चालला आहे . हे या आयोजनाचे यश आहे . दरवर्षी असे आयोजन आपण करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले . आजचा युवक व्यसनाकडे वळत आहे . मात्र अशात आपण शरिर सुदृढ करण्याच व्यसन अंगीकारल आहे . आपण या क्षेत्रात स्वताचे आणि पर्यायाने चंद्रपूरचे नाव गौरवांकीत करावे असे यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले . तर या प्रसंगी बॉडी बिल्डर यांना मार्गदर्शन करतांना निलेश दगडे म्हणाले की, चंद्रपूरात ही स्पर्धा पाहण्यासाठी आलेली गर्दी उत्साह वाढविणारी आहे . मुंबई सारख्या शहरात होणा–या आयोजना सारखेच हे आयोजन असून हे उत्तम आयोजन आहे . या शहरात बॉडी बिल्डिंग खेळाला दिल्या जात असलेले प्रेम मनोबल वाढविणारे आहे . बॉडी बिल्डींग क्षेत्रात येण्यासाठी ईच्छुक असलेल्या युवकांमध्ये शिस्त असली पाहिजे . या क्षेत्रात उद्या या शब्दाला जागा नाही . आजची कसरत आजच केली पाहिजे . यात खंड पडू देउ नका . खानपान योग्य ठेवा असे ते यावेळी म्हणाले .

# हादगावात हिंदवी स्वराज्य संघटनेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**सिध्दार्थ वाठोरे**

**हदगाव :** शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त हिंदवी स्वराज्य संघटनेच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंदवी स्वराज्य संघटनेच्या वतीने हदगाव येथे भव्य दिव्य मिरवणूक व भव्य राज्यस्तरीय शिवजन्म सोहळ्याचे आयोजन व विविध क्षेत्रातील आणि अठरापगड जाती व बारा बलुतेदार यामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यातील विविध जिल्ह्यातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा मानसन्मान करण्यात येणार आहे.

यावर्षीच्या शिवजन्मोत्सव सोहळा हदगाव २०२४ च्या अध्यक्षपदी शिवाजी दतराव जाधव, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी सचिन पाटील जाधव, व राजू पाटील कदम, यांची निवड करण्यात आली आहे. तर स्वागत अध्यक्षपदी अविनाश पाटील मोरे, व नारायण शिवनातवाड, सचिव पवन पाटील मोरे, व ओमकार पाटील चंद्रवंशी, सहसचिव कृष्णा पाटील गिरामकर, व शरद पाटील कदम, कार्याध्यक्षपदी मारोती पाटील सूर्यवंशी, अमोल पाटील वानखेडे व सुरेश पाटील सूर्यवंशी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.. ज्येष्ठ मार्गदर्शक म्हणून ॲड. दिगंबर सूर्यवंशी, संदीप आढाव, सचिन पाटील देवराये, नागोराव पाटील सावंत, विनोद गनमुखे, मिलिंद पाईकराव, पिंटू काळे, नागेश पाटील मोरे, पांडुरंग पाटील सूर्यवंशी, मोतीराम पाटील वानखेडे, सचिन पाटील मोरे, पप्पू पाटील सूर्यवंशी, आकाश पाटील कदम, मारोती इंगोले, दीपक गिरामकर, सचिन जोगदंड, माधव पाटील अंबाळकर, सुनील शिवनातवाड, खंडू जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. यावर्षीच्या शिवजन्मोत्सव सोहळ्यामध्ये आयोजित विविध स्पर्धामध्ये भाग घेण्यासाठी नोंदणी करून आपण आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसह जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा. असे आवाहन अध्यक्ष शिवाजी जाधव हरडफकर यांनी केले आहे.

## वेळेवर निदान व उपचार झाल्यास कॅन्सर बरा होतो

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** वेळेवर उपचार व निदान झाल्यास कॅन्सर बरा होतो कॅन्सरचे योग्य वेळी निदान उपचार होणे गरजेचे आहे कॅन्सर झाल्यास घाबरून न जाता त्याचा सामना करत त्या आजारातून बाहेर पडावे, असे आव्हान साईबाबा संस्थान सुपर हॉस्पिटलमधील कॅन्सर रोग तज्ञ डॉक्टर मुकुंद घरोटे यांनी सांगितल साईबाबा संस्थानच्या त्रि सदस्य समितीच्या माध्यमातून गेल्या दिड वर्षापासून शिर्डी येथे दर शनिवारी कॅन्सर उपचार मार्गदर्शन व भिजोथेरपी उपचार सुरू करण्यात आले असून गेल्या वर्षभरात जवळपास १५० पेक्षा जास्त रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतल्या असल्याची माहिती डॉक्टर मुकुल घरोटे यांनी दिली त्यांनी सांगितले की सध्या पुरुषांमध्ये मुखरोग व फुफ्फुसाचे कॅन्सर तर महिलांमध्ये स्तन अंडकोषाचा कॅन्सर दिसून येतो पण वेळेवर लक्षणे दिसताच उपचार घेण्यासाठी मोठी गरज आहे. गर्भपिशवीचा कॅन्सर लसीकरण यासंबंधी माहिती दिली. निरोगी आरोग्यदायी आहार त्याचबरोबर जीवनशैलीत सुधारणा करण्याबाबत मार्गदर्शन केले कॅन्सर रोगामुळे भारतात अनेकांचा बळी जात आहे वेळेवर निदान उपचार न झाल्याने बरा होणारा कॅन्सर जीवघेणा बनत आहे. अशी खंत व्यक्त केली. रुग्णांनी वेळेवर तपासणी करून घेणे आवश्यक आहे साईबाबा संस्थानच्या माध्यमातून दर शनिवारी साईबाबा सुपर हॉस्पिटलमध्ये डॉक्टर मुकुंद खरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार मार्गदर्शन व फीजोथेरपी उपचार सुरू करण्यात आले आहे वर्षभरात अनेक रुग्णांनी याचा लाभ घेऊन साईंच्या आशीर्वादाने ते बरे झाले आहे. त्यासाठी रुग्णांनी याचा लाभ घ्यावा, अशी आवाहन केले आहे.




## ईश्वरभक्तीचा विसर पडू नये म्हणून संतसंगतीची कास धरा : ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** परमेश्वराचे नामस्मरण हे कुठल्याही धनसंपदापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणून भक्तांनी भगवंतांच्या नावाचा विसर पडू नये म्हणून संतसंगतीची कास धरावी असे मत हभप पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी व्यक्त केले. श्रीक्षेत्र राजूर येथे असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सातव्या दिवशी त्यांनी हेंचि दान देगा देवा | तुझा विसर न व्हावा || गुण गाईन आवडी |हेचि माझी सर्व जोडी || न लगे मुक्ति आणि संपदा |संतसंग देई सदा || तुका ह्मणे गर्भवासी |सुखें घालावें आह्मांसी || या जगद्गुरु संत तुकोबारायांच्या अभंगावर निरूपण केले.

भाविकांचे उद्बोधन करतांना पाटील महाराज म्हणाले की एखाद्यावेळी सांसारिक गोष्टीचा विसर पडला तरी चालेल पण ईश्वराचे विस्मरण होता कामा नये.म्हणून संतांनी तुझा विसर पडू नये हेच दान मागितले आहे.ईश्वर भक्तीमध्ये सक्ती महत्वाची नसून देवाचे गुण गाण्याची आवडही महत्वाची आहे. त्यासाठी सत्संगती महत्त्वाची आहे. सतसंगतीने जीवनात उद्धार झाल्याशिवाय राहत नाही असे अनेक उदाहरणे देऊन महाराजांनी श्रोत्यांना मंत्रमूद केले. जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात 'तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी'या उक्तीप्रमाणे जर मृत्यू लोकांमध्ये मानव जन्म मिळाला तर आवडीने भगवंताच्या नामस्मरण करा.

जगद्गुरु तुकोबारायांच्या सहवास लाभला म्हणून त्यांचे विचार आचरणात आणून छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे स्वराज्य निर्माण केले.शिवरायांनी धर्म आणि संस्कृतीचे संरक्षण केले.त्यांच्या प्रेरणेतून अयोध्येत आज आपण भव्य श्रीराम मंदिर निर्माण करू शकलो. माणसाने सदमार्गाने धनसंपदा प्राप्त करावी. त्यातील काही हिस्सा दान करावा.आईवडील हे आपले दैवत आहेत. आई वडील हेतर मायेचा अथांग सागर आहेत. त्यांच्यामुळे आपल्या जीवनास आकार मिळतो म्हणून आयुष्यात कधीच आई-वडिलांना विसरू नका असे भावनिक आवाहनही पाटील महाराज यांनी भक्तांना केले.यावेळी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सुविद्य पत्नी निर्मलाताई दानवे ,माजी नगराध्यक्ष भास्कर आबा दानवे, संतमहंत ,ग्रामस्थ व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आभार विष्णू महाराज सास्ते यांनी केले.

## संविधान रक्षणाची जबाबदारी सर्वसामान्यांवर!

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सर्वसामान्य माणसांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. संविधानावर होणारे हल्ले मोडून काढण्यासाठी आणि संविधानाचे संरक्षण करण्यासाठी सर्वसामान्य भारतीयांनी पुढे येण्याची गरज आहे असे प्रतिपादन येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी केले. तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राची धम्मदान व धम्मसंदेश यात्रा आखाडा बाळापूर येथे सम्राट अशोक बौद्ध धम्म परिषदेत गेल्यानंतर भदंत पंय्याबोधी थेरो बोलत होते. यावेळी मुळावा येथील ज्ञानालंकार शिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. भदंत खेमधम्मो यांच्यासह



भिक्खू संघ उपस्थित होता. धम्मदेसना कार्यक्रमांतर्गत उपदेश देतांना भदंत पंय्याबोधी थेरो यांनी नागरिकांच्या वर्तनावर आणि बोलण्यामध्ये असलेल्या तफावतीवर बोट ठेवले. ते पुढे म्हणाले की, आजचे हिंदुत्ववादी सरकार भारतीय संविधानावर छुप्या पद्धतीने हल्ले करीत आहे. संविधान आहे म्हणून सर्वसामान्य माणूस सुरक्षित आहे. तो मोकळ्या मनाने जगू शकतो. त्यासाठी संविधान सुरक्षित असणे गरजेचे आहे. संविधानाच्या रक्षणासाठी सर्वसामान्य नागरिकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. दुसऱ्या सत्रात सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. संध्या रंगारी यांचे व्याख्यान झाले. तिसऱ्या सत्रात प्रख्यात गायक अनिरुद्ध बनकर यांच्या प्रबोधनपर गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

**धम्म परिषदेत आयोजकांचे टोचले कान**

बौद्ध धम्म परिषदेच्या नावाखाली राजकीय पक्षांच्या प्रचारसभा सुरू करण्याचा घातकी प्रयोग आयोजकांनी चालवला आहे . धम्म परिषदेत संविधान विरोधी राजकीय पक्षांच्या नेत्यांना आणि त्यांच्या झेंड्यांना फिरकू देऊ नये . धम्म परिषदेसाठी जमलेल्या लोकांचा वापर राजकीय कामांसाठी करु नये . आयोजक एकाच कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या राजकीय नेत्यांचे फोटो छापून पॉंपलेट, पत्रिका छापून प्रचार करीत आहेत . हा प्रकार दुर्दैवी असून, ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असा सज्जड दम देत भदंत पंय्याबोधी थेरो यांनी आयोजकांचे कान टोचले .

## संत सेवालाल महाराज जयंती जल्लोषात साजरी करा : सरपंच रत्नाताई चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात देव्हारी, टिटवी पळसखेडा, नांदा तांडा, चारुतांडा,जामठी, नादांगाव घाणेगाव तांडा 15 फेब्रुवारी २०२४ रोजी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनावर समाज प्रबोधन महाप्रसाद भोग घरोघरी दिवे लावून येणाऱ्या तरुण पिढीला जागृत करा असे आवाहन सरपंच सौ रत्नाताई सुरेश चव्हाण यांनी केलेले आहे. क्रांतिकारी सद्गुरु सेवालाल महाराज यांची बंजारा समाजाचे संत सेवालाल महाराज यांच्या आईचे नाव धरमणी होते. ती जयराम वडतीया (सुवर्णा कप्पा, कर्नाटक) यांची राजकन्या होती. भीमा नायक यांच्या लग्नानंतर त्यांना जवळजवळ १२ वर्षे मूलबाळ नव्हते, पुढे जगदंबा मातेची पूजा व कृपेमुळे धर्मनी व भीमा नाईक यांना सेवालाल महाराज यांचा जन्म झाला अशी बंजारा समाजात एक श्रद्धा आहे.

संत सेवालाल महाराज यांचे श्रीक्षेत्र रुईगड येथे निधन झाले. आणि महाराष्ट्र राज्यातील वाशिम जिल्ह्यातील पोहरागड येथे त्यांची समाधी आजही जगदंबेच्या मंदिराशेजारी आहे. आध्यात्मिक आणि समाजप्रबोधनातून समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. सेवालाल महाराज यांची भविष्यवाणी आजही काळाच्या कसोटीवर तंतोतंत खरी ठरली आहे. बंजारा समाजातील महायोद्धा राजा लखीशाह बंजारा, गोर राजाभोज, क्रांतिकारी संत गोविंद गुरू बंजारा, बाबा मख्खनशाह बंजारा, शूरवीर बल्लुराय बंजारा, वीरांगना मल्लिका बंजारन, गोरा बादल, आला उदल, नायक मनिसिंह पवार, राजागोपीचंद



गोर, वीरांगना दूर्गावती बंजारन, वीर दुर्गादास राठोड , जयमल फत्ता सिंह या शुर पराक्रमीच्या इतिहासाच्या शौर्यगाथा आजही बंजारा साहित्य बरोबरच शिख इतिहासात सुद्धा दिसून येते. माता जगदंबा बंजारा देवी, व्यंकटेश्वर बालाजी, संत हाथीराम बाबा महाराज, संत रूपसिंह महाराज यासह संत सेवालाल महाराज आणि संत सामकी माता यांना समाजात विशेष आस्थेचे स्थान आहे. क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांनी आपल्या गौर बंजारा भाषेत दिलेला उपदेश आहे.संत सेवालाल महाराज हे थोर मानवतावादी संत होते. मानवी कल्याणासाठी त्यांनी सर्वदूर मानवता, पर्यावरण रक्षण, गोरक्षाचा संदेश दिला. महाराष्ट्र व तेलंगाना राज्यात संत सेवालाल महाराज यांची जयंती शासन स्तरावर साजरी केली जाते. धर्माच्या रक्षणासाठी त्यांनी निजामाविरूद्ध लढा सुद्धा उभारला होता. समाजातील अनिष्ठ रूढी व शोषणाविरुद्ध त्यांनी आपल्या वाणीतून प्रहार चढवून सामाजिक सुधारणासाठी आग्रही भूमिका घेतली.त्यामुळे आपल्या भागातील परिसरात संत सेवालाल महाराज यांची २८५ जयंती तांड्या, वस्त्यांमध्ये मोठ्या थाटामाटात आनंदात साजरी करण्यात यावी असे आव्हान सरपंच सौ रत्नाताई सुरेश चव्हाण व सुरेख चव्हाण सामाजिक कार्यकर्ते घाणेगाव तांडा ता सोयगाव यांनी केले आहे.



## युवा सेना तालुका प्रमुखपदी विजय गोर्डे

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या युवा सेनेच्या नुकत्याच झालेल्या नियुक्तीत युवासेना कोपरगाव तालुका प्रमुख पदी विजय गोर्डे यांची नियुक्ती झाली आहे त्यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

आगामी एप्रिल महिन्यात लोकसभा निवडणूक आणि त्या पाठोपाठ ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणूक यावर्षी संपन्न होत असल्याने शिवसेवा उद्धव गटासह सर्वच राजकीय पक्ष आपल्या पदाधिकारी निवडीत मग्न झाले आहेत. त्याला कोपरगाव तालुका शिवसेवा उद्धव ठाकरे गट अपवाद नाही. त्यांनीही आगामी निवडणूक व त्यासाठी पक्ष बांधणीची गरज लक्षात घेऊन आपली पावले उचलली आहेत.त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या युवा सेनेच्या नुकत्याच झालेल्या नियुक्तीत निळवंडे कालवा कृती समितीत कालवे करण्यात सरकारला भाग पाडलेले युवा कार्यकर्ते व युवासेना कोपरगाव तालुका प्रमुखपदी विजय गोर्डे यांची नियुक्ती झाली आहे. दरम्यान अन्य पदाधिकारी नियुक्ती झाली असून त्यात चंद्रकांत रामदास भिंगारे, प्रसाद दत्तात्रय सूर्यवंशी, विजय यादवराव भोकरे, गणेश राजेंद्र थोरात, कर्णा कारभारी जावळे या सर्वांची युवा सेना उपतालुकाप्रमुख पदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे निळवंडे कालवा कृती समिती व ग्रामीण कोपरगाव तालुक्यामध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. यावेळी निळवंडे कालवा कृती समितीचे जेष्ठ नेते आप्पासाहेब भीमराज कोल्हे, कौसर रज्जाक सय्यद, प्रवीण दत्तात्रय कोल्हे, सुनील भाऊसाहेब गायकवाड, चंद्रकांत नानासाहेब पाडेकर, सतीश मंडाजी म्हाळसकर, सुमित बाळासाहेब कोल्हे, अमोल देवचंद खामकर, विकास नवनाथ पाडेकर, प्रकाश नवनाथ सरवार, आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. सदर प्रसंगी आप्पासाहेब कोल्हे म्हणाले की, बालपणापासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन शिवसेना पक्षाची भूमिका व शिवसेनेचे काम ग्रामीण भागात सामान्य जनतेपर्यंत नेऊन पोहचवण्याचे काम विजय गोर्डे यांनी केले आहे. त्यांच्या निष्ठेची हि पोच पावती असल्याचे आप्पासाहेब कोल्हे यांनी शेवटी म्हटले असून या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## ज्या शेतकऱ्यांची ई-केवायसी बाकी आहे त्यांनी करून द्यावी : जि.प. सदस्य जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील व सोयगाव तालुक्यात शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळवून देणाऱ्या केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची संपृक्तता साध्यतेसाठी राज्यात दिनांक ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत राबविलेल्या मोहिमेत १.०४ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रमाणिकरण, ३.०१ लाख स्वयंनोंदणीकृत शेतक-यांची नव्याने नोंदणी करण्यात आली. तथापि, राज्यातील एकुण १.९४ लाख शेतक-यांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक इतर सर्व बाबींची पूर्तता केलेली असून त्यांचे केवळ ई-केवायसी करणे बाकी आहे.त्यांनी तात्काळ करून द्यावे असे आवाहन जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी केले आहे. अशा शेतक-यांचे मुख्यतः सामाईक सुविधा केंद्रांमार्फत (CSCS) EKYC प्रमाणिकरण करण्यासाठी दि. १२ फेब्रुवारी ते दि. २१ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आणखी १० दिवसांची देशव्यापी संपृक्तता मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेची क्षेत्रीयस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मा. आयुक्त कृषी डॉ. प्रवीण गेडाम यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. या मोहिमे दरम्यान केवळ EKYC प्रमाणिकरण बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या नजिकचे सामाईक सुविधा केंद्र व ग्रामस्तरीय नोडल अधिकारी (VNOS) यांचे मार्फत EKYC प्रमाणिकरण पूर्ण करावे. शेतकऱ्यांनी स्वतःचे ई-केवायसी प्रणाणिकरण करण्यासाठी मोबाईलवरील ओटीपी, सामाईक सुविधा केंद्र, पी. एम. किसान फेस ऑथेंटिकेशन ॲप या सुविधांपैकी कोणत्याही एका सुविधेचा वापर करावा,पी. एम. किसान योजने अंतर्गत ई-केवायसी प्रमाणिकर करणे, योजनेसाठी नव्याने नोंदणी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांनी समक्ष हजर असणे आवश्यक आहे. बँक खाती आधार संलग्न करणे बाकी असलेल्या शेतक-यांनी आपल्या सोईनुसार प्राधान्याने नजीकचे पोस्ट कार्यालयामध्ये आधार संलग्न खाते उघडावे. केंद्र शासन पी. एम. किसान योजनेचा १६ वा हप्ता माहे फेब्रुवारी, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वितरीत करणार आहे. तसेच पी. एम. किसान योजनेचा लाभ अदा केलेल्या लाभार्थीनाच राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ अदा होईल.

# परीक्षेतच नव्हे तर जीवनातही यशस्वी बनवणारा डीएफसी पॅटर्न

## ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त पॅटर्न : स्वतःशी स्पर्धा करण्यावर भर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्पर्धेच्या युगात आपल्या पाल्याचे भविष्य कसे राहील याची चिंता प्रत्येक पालकाला असते. या स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांवरील ताण तणाव कमी करण्यासाठी केंद्र सरकारने मध्यंतरी नव्याने धोरण जाहीर केले असले तरी गेल्या दीड दशकापासून शहरातील डीएफसी अर्थात ज्ञानदीप फाउंडेशन सेंटर यावर प्रभावीपणे काम करत आहे. केवळ परीक्षेतच नव्हे तर जीवनातही तो विद्यार्थी यशस्वी व्हावा यासाठी डीएफसीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सवयी लावण्यासाठी विविध सिस्टीम्स बनविण्यात आल्या आहेत.

**अभ्यासासह सर्वांगीण विकास :** याविषयी माहिती देताना डीएफसीच्या संचालिका शीतल काबरा यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर प्रकाश टाकला.

डीएफसी मध्ये ५ वी १० च्या विद्यार्थ्यांना आठवड्यातून दोनच दिवसा साठी क्लास असतो आणि उर्वरित ५ दिवस विद्यार्थ्यांना सेल्फ स्टडी सह मैदानी खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येतं. फिटनेस शिवाय आपला छंद जोपासत अभ्यास केल्यास तो अधिक प्रभावी ठरतो. खेळामुळे मुलांना जिंकण्याची आणि पराभूत होण्याचा अनुभव मिळतो. पराभूत झाल्यावर आपण कुठे कमी पडलो याची तो चाचपणी करून पुढच्या वेळी जिंकतो. एकंदर शालेय जीवनातच काय भविष्यात देखील तो पराभवाने अजिबातच खचून न जाता पुन्हा नव्याने तितक्याच जोमाने यशस्वी होण्यासाठी सज्ज होतो. मुलांचे बालपण न हिरावता त्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत



टिकण्यासाठी तयार करण्याचे काम डीएफसी करत आहे.

**स्पर्धा परीक्षा आणि त्याचे तंत्र :** आजघडीला कला, विज्ञान, वाणिज्य शिक्षणासोबत सरकारी, खासगी क्षेत्रात सर्वच ठिकाणी स्पर्धा परीक्षेशिवाय पर्याय नसल्याचे पहावयास मिळते. शालेय स्तरावरील परीक्षा या व्यक्तिनिष्ठ (सब्जेटिव्ह) तर स्पर्धा परीक्षा या वस्तुनिष्ठ (ऑब्जेक्टिव्ह) असतात. यात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना काही कौशल्यांना आत्मसात करण्याची गरज असते. डीएफसीच्या वतीने या स्किल्स अर्थात कौशल्यआधारित पॅटर्नवर प्रामुख्याने काम केले जाते. विद्यार्थ्यांना विचार करून उत्तर देण्याचे, इमॅजिन करणे, लॉजिकल अप्रोच, डिसीजन मेकिंग ऍबिलिटी, टाइम मॅनेजमेंट अशा अनेक पैलूंनी तयार करण्याची किमया डीएफसीच्या माध्यमातून साधली जाते.

कौशल्य विकास तंत्र अर्थात स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे तंत्र शिकवले

DNYANDEEP FOUNDATION CENTRE
DFC
House of Competitive Examination Studies
DNYANDEEP FOUNDATION CENTRE

गेल्यास त्यांचा पाया भक्कम होतो शिवाय त्यावर अचानक अभ्यासाचा ताणही येत नाही. पाचवी ते दहावी या अत्यंत महत्त्वाच्या कालखंडात मुलांना त्यांचे छंद, खेळ, संगीत, विविध कला प्रकारांची आवड जोपासत अभ्यास करू दिला पाहिजे. त्यामुळे आठवड्यात केवळ दोनच दिवस (तीन-तीन तास) डीएफसीत क्लास आयोजित करण्यात येतो. उर्वरित वेळ हा त्याला सेल्फ स्टडीसाठी मिळतो. मुले शारीरिक आणि मानसिक दृष्टीने सक्षम बनले तर त्यांना आव्हानांना सामोरे जाताना फारशा अडीअडचणी येत नाहीत, असेही डीएफसीचे संचालक गोविंद काबरा यांनी नमूद केले. विशेष म्हणजे त्यांना दुसरा शिकवणी वर्ग लावायची गरज सुद्धा भासत नाही. स्पर्धा परीक्षा पॅटर्नमध्ये सर्वात महत्त्वाचं म्हणजे शिकवण्यापेक्षा विद्यार्थी कशा पद्धतीने जास्त शिकेल यावर भर द्यावा लागतो. विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट स्पष्टं होणे फार महत्त्वाचे असते. घोकंपट्टी करायची पाळी येता कामा नये. कारण त्यामुळेच ताणतणाव निर्माण होतात.

मुलांना शालेय अभ्यासक्रमासोबतच संलग्न अभ्यासक्रम शिकवल्यास त्याचा फायदा नक्कीच होतो. IIT, JEE, NEET, UPSC, CLAT, CA, MBA यासारख्या स्पर्धा परीक्षांचा पाया अधिक भक्कम होऊ शकतो, असे संचालिका शीतल काबरा यांनी आवर्जून सांगितले.

**सेल्फ कॉम्पिटिशन :** डीएफसीच्या वतीने मुलांना सेल्फ कॉम्पिटिशनच्या माध्यमातून इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करण्याचे बळ देत आहे.एकदम मोठी झेप न घेता मुलांना थोडीथोडी प्रगती कशी साधायची यावर भर दिला तर त्या मुलावर अधिकचा भार पडत नाही. मागील वेळी जितके गुण घेतले त्यापेक्षा यंदा त्यात भर टाकून किती प्राप्त केले यावर लक्ष्य केंद्रित केले तर इतरांशी तुलना देखील टळते. आपली स्पर्धा ही स्वतःशी आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्याची प्रगती अधिक गतिमान होते.

**डीएफसी हेल्पलाईन :** बऱ्याचदा वर्गात शिकवला जाणारा विषय विद्यार्थ्याला पूर्णतः आत्मसात होत नाही. त्याला निर्माण झालेली शंका तो वर्गात सर्वांच्या समोर बोलू शकला नाही तर त्या शंकेचे निरसन राहून जाते. परंतु, डीएफसीच्या हेल्पलाईनवर विद्यार्थी किंवा त्याच्या पालकाच्या सर्व शंकांचे निरसन केले जाते. एका टेक्स मेसेजवर हेल्पलाईनवरून त्यांच्याशी संवाद साधून अडचण दूर केली जाते. विद्यार्थ्याला न समजलेली गोष्ट संबंधित शिक्षक ऑनलाईन / ऑफलाईन विशेष वर्ग घेऊन त्याचे पूर्ण समाधान करण्यासाठी कटिबद्ध असतात. निःसंकोचपणे विद्यार्थी, पालक आपल्या अडचणी या हेल्पलाईनच्या माध्यमातून सोडवतात हे विशेष!



# 'हर घर जोडो' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शेकडो नागरिकांनी स्वीकारले शेकापचे सभासदत्व

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**गडचिरोली :** शेतकरी कामगार पक्षाच्या महिला नेत्या जयश्रीताई जराते यांच्या नेतृत्वात आजपासून गडचिरोली शहरात हर घर जोडो अभियानाची सुरुवात करण्यात आली. संघर्षनगर येथे या अभियानाचे उद्घाटन जिल्हा चिटणीस भाई रामदास जराते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा खजिनदार भाई शामसुंदर उराडे, राजकुमार प्रधान, यादवप्रसाद कौशल, विनोद लटारे, देवचंद खैरे, संजय बोदलकर, छाया भोयर, विजया मेश्राम, पुष्पा कोतवालीवाले, रजनी खैरे, सुमन परसा प्रामुख्याने उपस्थित होते.

सत्ताधारी भांडवलदारांच्या इशाऱ्यावर हुकूमशाही पद्धतीने वागत आहेत तर प्रमुख विरोधी पक्ष अस्वस्थ आहेत. अशा स्थितीत कष्टकरी जनतेच्या समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आता शेतकरी कामगार पक्षाच्या पक्षाच्या झेंड्याखाली एकत्र येणे हाच पर्याय आहे. पक्ष संगठन भक्कम असेल तर अन्यायाच्या विरोधात आवाज उठवून न्याय मिळवता येतो. आणि भक्कम संगठनाच्या जोरावर हक्क मिळवून घेणे हाच शेतकरी कामगार पक्षाचा इतिहास आहे. त्यासाठीच पहिल्या टप्प्यात हर घर जोडो अभियाना अंतर्गत शहरात पक्ष सभासद नोंदणी करण्यात येणार असल्याचे भाई रामदास जराते यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. जिल्हा खजिनदार भाई शामसुंदर उराडे, महिला नेत्या जयश्रीताई जराते यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. हर घर जोडो अभियाना अंतर्गत घर भेट देणे सुरू केले असून जनतेने मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. संघर्षनगरातील ४५ कुटुंब आणि स्नेहनगर, लांझेडा येथील शेकडो नागरिकांनी पक्षाचे सभासदत्व स्वीकारले.

यावेळी सोमेश भोयर, सुभाष बावणे, राजकुमार डोंगरे, रविंद्र हजारे, रविंद्र बांगरे, सुनील बन्सोड,ओमेश हजारे, खुशाली बावणे, वेणू लाटकर, धारा बन्सोड, शिल्पा लटारे, कुमारीबाई कौशल, सुमन डोंगरे, विमलबाई क्षीरसागर, सुमन सोनटक्के, सरस्वता भोयर, शालू आभारे, सुशिला नैताम, आकाश आत्राम, सुरज ठाकरे उपस्थित होते.

# धान खरेदी केंद्राविरुद सामाजिक कार्यकर्ते ताटीकोंडावार यांनी केली पोलिस तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

> शासन खरेदी केंद्र किंवा अभिकर्ता संस्थांकडून ओलाव्याची तुट गृहित धरुन ३८ किलो ५०० ग्रॅम वजन धानाचीच उचल करीत असल्याने शेतकऱ्यांकडून 41 ते 42 .250 किलो प्रती गोणी (पोते) वजनाने केली जात असलेली खरेदी ही शुध्द लुट आहे .
> **सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावार**

**अहेरी :** राजाराम येथील धान खरेदी केंद्रावर मापात पाप केले जात असल्याचा दावा करुन १२ फेब्रुवारीला मन्नेराजाराम पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. या प्रकरणात खरेदी केंद्रावर गुन्हा नोंदवावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावार यांनी केली.

पोलिसांत केलेल्या तक्रारीत ताटीकोंडावार यांनी म्हटले आहे की, शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ आणि मार्केटिंग फेडरेशन मार्फत शेतकऱ्याकडून धान खरेदी करण्यात येते. सध्या आदिवासी विकास महामंडळाचे ९३ आणि मार्केटिंग फेडरेशनचे २१ असे साधारणतः ११४ खरेदी केंद्रांवर ही धान खरेदी सुरु असून आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांची मुस्कटदाबी केली जात येत आहे. शासन नियमा प्रमाणे खरेतर एका गोणी (पोते) मध्ये ४० किलो ६०० ग्रॅम वजनापेक्षा अधिक धानाची खरेदी करता येत नाही. मात्र जिल्हाभरातील सर्व धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांकडून ४२ ते ४३ किलो प्रती गोणी (पोते) वजनाने शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. राजाराम येथील खरेदी केंद्रावरही हा प्रकार होत असून गुन्हा नोंदवावा, अशी मागणी त्यांनी केली. सरपंच शारदा कोरेत, पोलिस पाटील इंदरशाह मडावी, कृष्णा सेडमाके उपस्थित होते.



# साई एम्प्लॉईज सोसायटीच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनल १७ जागांवर विजयी

## शिर्डी पोलीसांनी मोठा चोख बंदोबस्त ठेवला

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थानच्या कामगारांच्या साई एम्प्लॉईज सहकारी सोसायटीच्या झालेल्या निवडणुकीत विठ्ठल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उभे राहिलेल्या परिवर्तन विकास मंडळाला सभासदांनी १७ जागेवर विजयी करून एकतर्फी कौल दिला असून विरोधकांना चारी मुंड्या चित करून परिवर्तन मंडळाच्या हाती सत्ता दिली आहे कायम कामगारांसाठी संघर्ष करणाऱ्या विठ्ठल पवारांच्या हाती कामगारांनी ही सत्ता ताब्यात दिली असून सर्वसाधारण गटातून कृष्णा आरणे ८४५ महादू कादळकर ८४७ भाऊसाहेब कोकाटे ८३७ पोपट कोते ७९४ विनोद कोते ८८७ रवींद्र गायकवाड ७१८ देविदास जगताप ८१३ इकबाल तांबोळी ६६७ संभाजी तुरकणे ८२४ मिलिंद दुनबळे ७६९ तुळशीराम पवार ७४९ भाऊसाहेब लवांडे ७०८ अनुसूचित जाती जमाती मधून गणेश अहिरे १०२१ महिला राखीव प्रतिनिधी मधून सुनंदा जगताप ९२७ लता बारसे ८६३ इतर मागास प्रवर्गातून विठ्ठल पवार १२३४ भटक्या जाती विमुक्त जमाती मधून रंभाजी गागरे यांना ८९६मते मिळाली विजयाची घोषणा होताच कामगार सभासदांनी मोठा आंनद उत्सव साजरा केला यावेळी बोलताना विठ्ठल पवार यांनी सांगितले की आपला कामगार हाच पक्ष होता कामगार हितासाठी आपण मोठा संघर्ष केला मोठा लढा देत होतो त्या केलेल्या कामाची पावती सभासदांनी एक हाती सतरा उमेदवारांना विजयी करुन परिवर्तन पॅनलच्या हाती सत्ता देऊन परिवर्तन करुन दाखवली असुन हा विजय हा कामगार सभासदांचा असल्याचे सांगितले निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रावसाहेब खेडकर सचिव नबाजी डांगे यांनी काम बघितले यावेळी शिर्डी पोलीसांनी मोठा चोख बंदोबस्त ठेवला होता.

# गोदावरी फाउंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्र मोरे**

**चिखली :** चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथे दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी ग्रामपंचायत कार्यालय मेरा बुद्रुक व गोदावरी फाउंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ ग्रामपंचायत मेरा बुद्रुकला तीन वर्षे कार्यकाळ पूर्ण झाला यानिमित्ताचे अवचित्य साधून भव्य आरोग्य शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या भव्य आरोग्य शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेरा बुद्रुक गावचे सामाजिक कार्यकर्ते परशुअण्णा पडघान हे होते तर, उद्घाटक डॉ.रिंगे हे होते. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक चिखली तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रिंगे होते. या भव्य आरोग्य शिबिराचे आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बुलढाणा उपाध्यक्ष गजानन वायाळ हे होते. या अगोदरही गजानन वायाळ यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने सर्व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी वृंद यांच्या अनमोल सहकार्याने वेगवेगळ्या प्रकारचे ग्रामपंचायतच्या वतीने आरोग्य शिबिर घेण्यात आले होते. परंतु या भव्य आरोग्य शिबिरामध्ये मोफत ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणी, मुतखडास, मूत्रपिंडातील खडे, प्रोस्टेट, पित्ताशय खडा, स्वादुपिंड, छोट्या गाठी, मुळव्याध, हायड्रोसिल, अंडाशय शस्त्रक्रिया, भगंदर पित्ताशयाचे खडे पायातील शिरा फुटणे मूत्रपिंडाचे आजार पोट व आतड्यांच्या शस्त्रक्रिया कर्करोग निदान, बालरोग शस्त्रक्रिया, मेंदू मनका फक्चर, नाक, कान, घसा शस्त्रक्रिया, नेत्रालय, हृदयरोग, जनरल मेडिसिन, गर्भपिशवी, अस्थिरोग, मानसोपचार इत्यादी रोगावर तपासणी व मार्गदर्शन मोफत करण्यात आले.

# सीएसएमएसएस कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकला विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये १२ खेळ प्रकारांमध्ये पारितोषिके

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबईतर्फे आयोजित केलेल्या अंतरपदविका अभियांत्रिकी खेळ संघटनेमार्फत घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय येण्याचा मान पटकावला आहे.

यामध्ये मुलांच्या संघातून ॲथलेटिक्स या खेळ प्रकारामध्ये 200 मीटर धावणे, मुलींच्या संघातून बुद्धिबळ, टेबल टेनिस, ४०० मीटर धावणे, लांब उडी या खेळ प्रकारांमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले. तसेच मुलांच्या संघातून फुटबॉल, टेबल टेनिस, १०० मीटर धावणे, लांब उडी, गोळाफेक व मुलींच्या गटातून रिले व गोळाफेक या खेळ प्रकारांमध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले. विजेत्या संघाचे राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये खेळण्यासाठी पाठवले जाते. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचा अभ्यासासोबत सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होते असे मत प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी व्यक्त केले.

सदरील यशाबद्दल छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजीतभैय्या मुळे, सचिव श्री.पद्माकरकाका मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, उपप्राचार्य प्रा.चंद्रशेखर रहाणे यांनी विजेत्या संघाचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.अविनाश मिटकर, प्रा. धनश्री लाहोरे, क्रीडा शिक्षक डॉ. प्रवीण बनसोड, श्री. संतोष तावशीकर, कु .पूजा पांडे यांनी परिश्रम घेतले.



# दारू दुकानास पीरबावडा ग्रामस्थांचा विरोध, अवैध धंदे बंद करण्याची ग्रामस्थांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पिरबावडा येथे देशी दारूच्या दुकानासाठी नाहरकत देण्यासाठी हालचाली चालू असून यात मोठा अर्थिक व्यवहारातून ग्रामस्थांना आमिष दाखवून या देशी दारूच्या दुकानास ना हरकत देण्याच्या हालचाली चालू असल्याची ग्रामस्थांना कुणकुण लागताच गावातील ग्रामस्थ व तरुणांनी आज ग्रामसभेत अवैध धंदे व देशी दारूच्या दुकानास नाहरकत देऊ नये म्हणून ग्रामपंचायत पिरबावडा ग्रामसभेत ग्रामस्थांनी निवेदन दिले आहे की गावात सर्वधर्मसमभाव असून, गावात तीर्थक्षेत्र दर्जा असलेले श्री शहामिया बाबा यांची देशभर प्रसिध्द दर्गा असून मोठा संदल असतो त्यात विविध जातीधर्माचे लोकं येथे दर्शनासाठी येतात म्हणून गावात शांतता नांदावी तसेच गावात माध्यमिक व उच्चमाध्यामिक शाळा, आरोग्य केंद्र तसेच बॅंकेत येणाऱ्या जनतेला मद्यप्राशन करणाऱ्या व्यक्तींचा त्रास मोठ्या प्रमाणात होऊ शकतो तसेच जर देशी दारू चे दुकान चालू झाले तर अनेक युवक व्यसनाच्या अधीन होऊन अनेक संसार यामुळे बरबाद होतील गावात अशांतता, भांडण, तंटे निर्माण होऊन गृहकलह होतील तसेच अनेक छोट्या मोठ्या घटना नित्याच्या होतील यात अनेकांना याचे दुरोगामी परिणाम भोगावे लागतील यासाठी गावात कुठल्याही परिस्थितीत देशी दारूचे दुकान येऊ नये व या दुकानास कुठल्याही आमिषाला बळी पडून ना हरकत देण्यात येऊ नये यासाठी गावातील ग्रामस्थांसहित युवकांनी पुढाकार घेतलेला आहे आज ग्रामपंचायत कार्यालय पिरबावडा यांना दिलेल्या निवेदनावर उमेश फलफले, दौलत बोकील, अरुण गाडेकर, गजानन बोकील, भाऊसाहेब पाटोळे, रिजवाण पठाण, अनिस शेख, परमेश्वर बकाल, दिगंबर बोकील, अजिनाथ मुळे, संतोष उमके, विनोद लहाने, कलिम शेख आदी ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी सदस्य तथा आजी माजी पदाधिकारी यांच्या मोठ्या प्रमाणात सह्या आहेत.

गावात देशी दारूच्या दुकांनासाठी गावातील काही समाज विघातक वृत्ती आर्थिक आमिष दाखवून ग्रामस्थांची दिशाभूल करून गावातील वातावरण खराब करू पाहत असून कुठल्याही परिस्थितीत गावात देशी दारूच्या दुकानास मान्यता देण्यात येऊ नये यांसाठी गावातील महिला भगिनी, ग्रामस्थ व युवक सोबत आहेत.
**शिवनाथ गाडेकर मा. तंटामुक्त अध्यक्ष पिरबावडा)**

अवैध धंदे व दारु दुकानास विरोध केलेल्या निवेदनावर माझी प्रतिक्रिया घेण्यापेक्षा सरपंच यांची प्रतिक्रिया घ्या. (अस म्हणून ग्रामसेवक यांनी कॉल कट केला) **समाधान वाघ (ग्रामसेवक)**





# महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघ उपाध्यक्षपदी प्रसेनजित पाटील बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** महाराष्ट्र राज्य पणन महासंघ मुंबई निवडणूक 7 जानेवारी 2024 रोजी पार पडली त्यानंतर 9 जानेवारी रोजी झालेल्या मतमोजणीत ओबीसी मतदारसंघातून संपूर्ण राज्यातून झालेल्या मतमोजणी मध्ये प्रसेनजीत पाटिल यांनी भाजपा मंत्री गिरीष महाजन यांचे निकटवर्तीय चंद्रकांत बाविस्कार यांचा दारुण पराभव केला. या निवडणूकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे 8, राष्ट्रीवादी (शरदचंद्र पवार) पार्टीचे 4, राष्ट्रवादी (अजित पवार) पार्टीचे 4 व भाजपा 1 असे संचालक मंडळ निर्माण झाले. दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाची निवड झाली महाविकास आघाडी मध्ये काँग्रेस पक्षाचे सर्वांत जास्त 8 संचालक असल्याने त्यांना अध्यक्ष पद तर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार ) पक्षाला उपाध्यक्ष पद ठरले. त्यानुसार काँग्रेस आमदार तथा संचालक कुणाल पाटिल हे अध्यक्ष पदी तर राष्ट्रवादी नेते प्रसेनजीत पाटिल यांची अविरोध निवड करण्यात आली. या निवडी नंतर जळगाव जामोद येथे फटाके फोडून जल्लोष करण्यात आला. जल्लोष वेळी शिवसेना(उबाठा) सहसंपर्क प्रमुख दत्ता पाटील, शिवसेना तालुकाध्यक्ष गजानन वाघ, राष्ट्रवादी अल्पसंख्याक जिल्ह्याध्यक्ष एम.डी. साबीर, शहराध्यक्ष रमेश ताडे, राष्ट्रवादी जिल्हा प्रवक्ते करीम खान,कॉटन मार्केट संचालक विष्णू आटोळे, जिल्हा सरचिटनीस मोहसीन खान, सोशल मिडिया प्रदेश सचिव आशिष वायझोडे, विधानसभा अध्यक्ष दत्ता डिवरे, खरेदी विक्री अध्यक्ष अजहर पटेल,मुशताक भाईजान, शहर कार्याध्यक्ष सिद्धार्थ हेलोडे, पवन वाघ, संकेत रहाटे, दादाराव धंदर, वसीम पटेल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शासनाकडून जाहिरात वितरण प्रणालीत भेदभाव; लघु संवर्गातील साप्ताहिकांवर होतोय अन्याय

## विभागीय आयुक्त व संचालकांना जालना जिल्हा कृती समितीचे निवेदन; उपायुक्त व सहायक संचालकांचा सकारात्मक प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांवर शासनाकडून प्रसिद्धीस देण्यात येणाऱ्या दर्शनी व वर्गिकृत जाहिरात वितरण प्रणालीत भेदभाव केला जात आहे. हा साप्ताहिकांवर अन्याय असून छोटी माध्यमे संपविण्याचे शासनाचे धोरण असल्याची धारणा साप्ताहिकांच्या मालक- संपादकांमध्ये निर्माण होत आहे. त्यामुळे शासनाने सर्व संवर्गातील वृत्तपत्रांना समान न्यायाने सरसकट जाहिराती देण्यात याव्या या मागणीसह अन्य मागण्यांसंदर्भात जालना जिल्हा कृति समितीच्यावतीने विभागीय आयुक्त व संचालकांना निवेदन दिले आहे. यावेळी महेश जोशी, विनायक दहातोंडे, अभयकुमार यादव, दीपक शेळके, धनसिंह सुर्यवंशी, विलास खानापुरे, ज्ञानेश्वर ढोबळे यांच्यासह छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, आरेफ देशमुख, अखलाक शेख आदींची उपस्थिती होती. प्रसंगी उपायुक्त श्री मणियार यांनी वृत्तपत्रांचे प्रश्न जाणून घेत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांनी या आर्थिक वर्षातील शिल्लक राहिलेली सर्व बीले ही मार्च एण्ड पुर्वी देण्याचे आश्वासन दिले आहे. त्याबरोबर शासनाची महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर स्वायत्य संस्था यांना रोटेशन पद्धतीने जाहिरात वितरीत करण्यासंदर्भात जालना जिल्हा माहिती अधिकारी यांना येत्या दोन दिवसात पत्र पाठवून कळवू व त्यांना यासंदर्भात संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करणे, शासनमान्य वृत्तपत्रांची यादी त्या-त्या विभागाकडे पाठविणे व त्यांच्याकडून रोटेशन पद्धतीचा अवलंब होते की नाही याची तपासणी करून योग्य ते निर्देश संबंधीत विभागाला देण्याच्या सूचना करणार असल्याचेही सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांनी सांगितले आहे. जालना जिल्हा कृति समितीत प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हा, जिल्हा मराठी पत्रकार संघ, जालना, असो. स्मॉल मिडीयम न्यूजपेपर ऑफ इंडिया, पत्रकार स्वाभीमान समिती, साप्ताहिक दर्पण पत्रकार संघ, जालना जिल्हा साप्ताहिक-संपादक मंडळ, विधीमंडळ व मंत्रालय संपादक-पत्रकार संघ आदी पत्रकार संघटनांचा सहभाग आहे.यात प्रामुख्याने महात्मा गांधी जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, भगवान महावीर जयंती, नाताळ (25 डिसेंबर) रमजान ईद, रामनवमी, विजयादशमी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर जयंती, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती, महिलांच्या सन्मानार्थ महिला दिन अथवा मकर संक्रांत, महाराणा प्रताप जयंती, पंढरपूर यात्रानिमित्त व वृत्तपत्रांच्या वर्धापन दिन यातील जाहिरातीचा समावेश त्यात करण्यात यावा. (कारण - वृत्तपत्रांच्या उत्पन्नात वाढ होईल), शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.6.8 नियमाची अंमलबजावणी करण्यात यावी व शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी. , शासकीय संदेश प्रसार नियमावली -2018 मधील 4.12 नुसार वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यात प्रामुख्याने शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या सर्वच संवर्गातील वृत्तपत्रांच्या वेब (ब्लॉगर/ वर्डप्रेस), युट्युब, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी सर्व प्रकारच्या समाज माध्यमांना विनाअट जाहिराती देण्यात याव्यात., एका आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या जाहिरातील ह्या 400 चौसेमी आकाराच्या देण्यात येतात. या आकारात सरसकट वाढ करण्यात येऊन किमान 1000 चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात. (कारण - वृत्तपत्रांच्या उत्पन्नात वाढ होईल), साप्ताहिकांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात येऊन एका साप्ताहिकांच्या किमान 5 व्यक्तींना अधिस्विकृती पत्रिका देण्यात यावी. (कारण - ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या साप्ताहिकांच्या पत्रकारांना त्याचा फायदा होईल.), ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिका व पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात व त्यांना लवकरात लवकर पेन्शन देण्यात यावी., शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट वृत्तपत्रांना देण्यात येणाऱ्या जाहिरातीचे बील हे जाहिरात प्रसिद्धी नंतर किमान 30 दिवसांमध्ये अदा करण्यासंबंधी संबंधीत विभागांना आदेशित करावे. तसेच वृत्तपत्रांची मागील थकीत बीले ही तात्काळ अदा करण्यात यावी.



# आनंदी जीवनासाठी अंत:करणात भक्तीची ओढ असायला हवी

## काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता : ह.भ. प. जलाल महाराज सय्यद

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**निफाड :** श्रीक्षेत्र राजूरः समाजाने संत ज्ञानेश्वरासारख्या विचारवंतांना देखील बहिष्कृत केले होते.त्यासाठी जीवनात मोठा संघर्ष करावा लागला.मन,बुद्धी स्थिर ठेवून वाट्याला आलेल्या संकटांचा सामना केला. पांडुरंगावर त्यांची अढळ निष्ठा होती.म्हणून प्रत्यक्ष डोळ्यांनी त्यांना ईश्वराची प्रचिती आली. मनुष्याने आनंदी राहून जीवनात सुख मिळवायचे असेल तर ईश्वराप्रति श्रद्धा आणि अंतःकरणात भक्तीची ओढ असायला हवी असे प्रतिपादन ह.भ. प. जलाल महाराज सय्यद यांनी केले. श्रीक्षेत्र राजुर येथे अखंड हरिनामा सप्ताह निमित्त काल्याची कीर्तनरुपी सेवा देताना ते बोलत होते. मनीं वेधु वो तयाचा । पंढरीरायाचा ।। या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगावर त्यांनी सुंदर असे निरूपण केले. पुढे बोलताना जलाल महाराज म्हणाले की अनुभव व अभ्यास या दोन बाबी भिन्न आहेत.मनुष्याने परंपरेच्या पायीकत्वाला शोभेल असेच वर्तन करावे. भूतकाळात घडलेल्या घटनांचा पश्चताप व भविष्याची चिंता या कारणामुळे मनुष्य दुःखी राहतो.म्हणून काळजी सोडूनआनंदी जीवन जगायला शिकले पाहिजे असे जलाल महाराज म्हणाले. बाळाचे हित कशात आहे हे आई जाणते. त्याचप्रमाणे भक्ताचे हित कशात आहे हे संत जाणतात. योगी पावन मनाचे असतात. दुसऱ्यांचे कल्याण व्हावे अशी त्यांची धारणा असते. अपयशाला न डगमगता मनुष्याने फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेऊन यश संपादन करावे. कर्तृत्वामुळेच आपणास किंमत मिळत असते.राजा हरिश्चंद्र हा सत्यवादी होता. त्याने आपले सर्व राज्य स्वप्नातच दान केले होते. नामस्मरणाची तीव्रता वाढली की भक्तीच्या परमोच्च शिखरावर पोहचता येते. अंतःकरणात प्रेमाचा पाझर असेल तर समाज जोडता येतो असे स्पष्ट मत जलाल महाराज सय्यद यांनी मांडले.





# कमलनयन बजाज रुग्णालयात अवयव दानावर कार्यशाळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील कमलनयन बजाज रुग्णालयातर्फे अवयव प्रत्यारोपण या विषयावर निरंतर वैद्यकीय शिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
रविवारी (११ फेब्रुवारी) झालेल्या कार्यक्रमासाठी तीनशेहून अधिक डॉक्टर्स व अवयव प्रत्यारोपित झालेले रुग्ण तसेच अवयव प्रत्यारोपण करणारे समन्वयक या सर्वांची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी मुंबईहून प्रख्यात अतिवदक्षता तज्ञ डॉ. राहुल पंडित तसेच मोहन फाउंडेशनतर्फे जया जयराम व वीणा वाटोरे यांची पण उपस्थिती होते. झेडटीसीसी या संघटनेचे पूर्व अध्यक्ष व संस्थापक डॉ. सुधीर कुलकर्णी यांची उपस्थिती या कार्यक्रमासाठी होते. या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीनगर वैद्यकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे व प्रख्यात मधुमेह तज्ञ डॉ. संजीव इंदूरकर यांच्या सत्काराने झाली. आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल या दोघांचा सत्कार कमलनयन बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज फर्नांडिस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सुधीर कुलकर्णी यांनी छत्रपती संभाजीनगर शहरातील अवयव प्रत्यारोपण विषयावर मार्गदर्शन केले. शहरातील सर्व नामांकित वैद्यकीय व्यावसायिक तसेच सर्व संबंधित व्यक्तींच्या उपस्थितीने या कार्यक्रमाला शोभा आली. मराठवाडा मेडिकल व रिसर्च इन्स्टिट्यूट या ट्रस्टचे चेअरमन सी. पी. त्रिपाठी यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले. या कार्यक्रमासाठी कमलनयन बजाज रुग्णालयाचे सर्व मान्यवर कन्सल्टंट डॉ. अ. म. ढमढेरे, डॉ. श्रीगणेश पी. एकबोटे तसेच वैद्यकीय संचालक डॉ. मिलिंद वैष्णव, वैद्यकीय संचालक अजय रोटे यांच्यासह कमलनयन बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज फर्नांडिस हे देखील कार्यक्रम उपस्थित होते. कमलनयन बजाज नर्सिंग विद्यालयाच्या प्रिन्सिपल डॉ. सुप्रिया चिंचपुरे यांनी पण या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचा सहभाग नोंदविला.
कमलनयन बजाज रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज फर्नांडिस यांच्या संकल्पनेतून पूर्णत्वास गेलेला हा कार्यक्रम ज्ञान संवर्धनासाठी अत्यंत उपयुक्त ठरला अशी उपस्थितांची भावना होती. या निमित्ताने अवयव दान व अवयव प्रत्यारोपण याविषयी जागरूकता निर्माण होऊन जास्तीत जास्त गरजू व्यक्तींना अवयव उपलब्ध होतील, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी मोहन फाउंडेशन, फिजिशिअन असोसिएशन, आयएससीएम, एनएसथोएसीओलॉजिस्ट असोसिएशन औरंगाबाद युरॉलॉजी असोसिएशन, झेडटीसीसी या संघटनांनी सहभाग नोंदवला.

# चर्मकार समाज विकासावर मुख्यमंत्र्यांकडून आश्वासन : डॉ. गोपाल बशिरे

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी समस्या व चर्मकार समाजाच्या विकासावर शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय प्रवक्ता डॉ. गोपाल बशिरे यांच्यासोबत चर्चा करून सदरील समस्या सोडवण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.
मुंबई येथील सह्याद्री शासकीय भवनात झालेल्या विशेष बैठकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हासंघटक तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. गोपाल बशिरे यांना निमंत्रित करण्यात आले होते, सदरील दिड तास चाललेल्या बैठकीत डॉ. बशीरे यांनी बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची दैनिय अवस्था बघता संपूर्ण बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून विनाअट शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत त्यांच्या खात्यावर जमा करावी. पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी पीक विमा कंपनीस आदेशित करावे. लोणार सरोवर येथे सिंदखेडराजा येथील जिजाऊ सृष्टीच्या धरतीवर शिवसृष्टी निर्माण करावी जेणेकरून पर्यटक लोणार ला येतील व लोणारचा आर्थिक विकास होईल यासाठी आम्ही अनेक निवेदन आपणापर्यंत पाठवलेले आहे. त्याचबरोबर २०२० मध्ये चर्मकार समाजाच्या मागासलेपणाचे अध्ययन करण्यासाठी आयुक्त वाय.सी.पवार यांच्या अध्यक्षतेखाली चर्मकार आयोग नेमला होता तो आयोग सध्या निष्क्रिय झालेला आहे.त्या आयोगावर चर्मकार समाजाचा अभ्यासू व्यक्तीची नियुक्त करून त्याला पुनर्जीवित करावे, जेणेकरून चर्मकार समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक अभ्यास होऊन या समाजाच्या उन्नतीकडे लक्ष वेधले जाईल.
केंद्राने सरकारने गुरु रविदास जयंतीची सुट्टी घोषित केलेली आहे परंतु महाराष्ट्र शासनाने सदरील सुटी घोषित केली नाही ती गुरु रविदास जयंती पूर्वी घोषित करण्यात यावी.गुरु रविदासांच्या नावे महाराष्ट्रात विद्यापीठ स्थापन करण्यात यावे.कोरोनाच्या महामारीत चर्मकार समाजाचे अतोनात नुकसान झालेले आहे म्हणून लीडकॉम चे थकीत कर्ज माफ करावे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात रविदास भवन उभारून तेथे वस्तीगृहाची सुविधा व एमपीएससी यूपीएससी चे कोचिंग सेंटर सुरू करण्यात यावे, शालेय पाठ्यक्रमामध्ये गुरु रविदास यांचा धडा पूर्वीप्रमाणे समाविष्ट करावा, अशा अनेक मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा होऊन सचिवांना आदेश देऊन सर्व मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ.गोपाल बशीरे यांना दिले.
या बैठकीस सामाजिक न्याय मंत्री मा. संजय बनसोडे, खासदार सदाशिव लोखंडे, माजी सामाजिक न्याय मंत्री तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप नाना, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, अर्थ विभागाचे सचिव, सामाजिक न्याय विभागाचे सचिव, लीडकांचे आयुक्त, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे, राष्ट्रीय महिला अध्यक्षा सरोज ताई बीसूरे, राष्ट्रीय महासचिव दत्तात्रय गोतिसे, राष्ट्रीय सचिव उमाकांत डोईफोडे, राष्ट्रीय नेते ज्ञानेश्वरजी कांबळे, राष्ट्रीय नेते व उद्योजक अशोकजी माने, प्रदेशाध्यक्ष माधवरावजी गायकवाड, प्रदेशाध्यक्ष डॉ.शांताराम कारंडे, नेते अनिल कानडे, मुंबई अध्यक्ष राजू नेटके, राज्य उपाध्यक्ष नरहरी सोनवणे, परभणी जिल्हाध्यक्ष मुरली ठोंबरे, जिल्हाध्यक्ष विनोद असोरे, मंठा जोशाबा क्लस्टर सचिव दत्ता वाघमारे, रवी गंगासागरे, किरण कमडे उपस्थित होते.

# ग्रामसेवक युनियन निवडणूक; प्रगती पॅनलचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** नाशिक जिल्हा ग्रामसेवक युनियनच्या पंचवार्षिक निवडणुकीत कैलासचंद्र वाघचौरे यांच्या नेतृत्वाखालील प्रगती पॅनलचा दणदणीत विजय झाला. महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन डीएन १३६ जिल्हा शाखा नाशिकची सन २०२४- २०२९ पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम जिल्हा सरचिटणीस रवींद्र शेलार यांनी घोषित केला होता. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी मच्छिंद्र कांगणे, राज्य निरीक्षक कैलासचंद्र
वाघचौरे, सहनिरीक्षक प्रदीप सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडणूक कार्यक्रम पार पडला. कैलासचंद्र वाघचौरे यांची विस्ताराधिकारी पदोन्नती झाल्याने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्याच सभेत ११ पैकी पैकी १० व स्वीकृत १५ पदाधिकारी यांचे पैकी नऊ पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे सर्व तालुका अध्यक्ष सचिव यांच्या मागणीनुसार संपूर्ण जिल्हा कार्यकारणी विसर्जित करून नवीन



जिल्हा कार्यकारणी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्याबाबत ठराव करण्यात आला होता. ११ पदांकरिता २० नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. महिला उपाध्यक्ष पदासाठी प्रगती पॅनलच्या सुवर्णा भामरे आणि महिला संघटक पदासाठी कांचन आनट यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची जागा बिनविरोध झाली. कायदेशीर सल्लागार पदासाठी पंकज पवार यांनी माघार घेतल्याने प्रगती पॅनलचे किरण चंद्रमौळी यांची बिनविरोध निवड झाली. संघटक पदासाठी किशोर भामरे यांनी माघार घेतल्याने प्रगती पॅनलचे सुनील शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. अध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष सरचिटणीस, कोषाध्यक्ष व सहसचिव या सहा पदांसाठी १२ उमेदवारांचे नामनिर्देशन राहिल्याने सरळ लढत झाली. मतमोजणी निवडणूक निर्णय अधिकारी, राज्यनिरीक्षक कैलासनाना वाघचौरे, प्रदीप सोनवणे, मतदार प्रतिनिधी दौलत गांगुर्डे, अरुण आहेर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. प्रगती पॅनलचे अध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार प्रमोद ठाकरे यांना २९ पैकी २३ रविंद्र ठाकरे यांना ६ मते,
कार्याध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार अशोक अडसरे यांना २९ पैकी २२ मते व संतोष सोनवणे यांना ७ मते, उपाध्यक्षपदाचे विजयी उमेदवार देवेंद्र हिरे यांना २९ पैकी २४ व सुनील पवार यांना ५ मते, सरचिटणीस पदाचे विजयी उमेदवार संजय गिरी यांना २९ पैकी २२ व बापू अहिरे यांना ७ मते, कोषाध्यक्ष पदासाठी प्रगती पॅनलचे उमेदवार सुनील निकम यांना २९ पैकी २५ व विनोद सुधाकर अहिरे यांना ४ मते, सहसचिव पदासाठी बाळू खंबाईत यांना २९ पैकी २४ व श्रावण वाघचौरे यांना ४ मते पडली.
निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मच्छिंद्र कांगणे व सहा.निवडणूक निर्णय अधिकारी सुनील शिरसाठ यांनी कामकाज पाहिले. मावळते सरचिटणीस रवींद्र शेलार, राज्याचे मानद अध्यक्ष कैलासचंद्र वाघचौरे, नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद ठाकरे, राज्य सहनिरीक्षक प्रदीप सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार नवनिर्वाचित सरचिटणीस संजय गिरी यांनी मानले.

# मार्कंडा कणसोबा फाट्यावर बस थांबा देऊन प्रवासी निवारा उभारा

## वेळेवर बस उपलब्ध करून देण्याची माजी ग्रामपंचायत सदस्य भास्कर फरकडे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील विविध भागात अपुरी बससेवा, प्रवासी निवाऱ्याचा अभाव, बससेवेअभावी दररोजची पायपीट यामुळे विद्यार्थी, विद्यार्थिनींची गैरसोय सुरूच आहे. ठिकठिकाणच्या रस्त्यावर उन्हाचे चटके, पाउस, वारा झेलत कितीतरी तास ताटकळत उभे राहावे लागत असल्याने आता लालपरीवर शालेय विद्यार्थी मेटाकुटीला आले आहेत.

चामोर्शी तालुक्यातील मार्कंडा कंन्सोबा येथील फाट्यावर बसच्या प्रतीक्षेत शालेय विद्यार्थिनींना कितीतरी तास थांबावे लागत आहे. त्यात निवारा नसल्याने अडचणीचा सामना करावा लागतो आहे तर मार्कंडा कंन्सोबा येथील विद्यार्थ्यांना शाळा सुटल्यानंतर आष्टी येथे बसच्या प्रतीक्षेत कित्येक तास बसची प्रतिक्षा करावी लागत आहे.

तालुक्यातील आष्टी येथे जिल्हा परिषद शाळा खाजगी संस्थेचे विद्यालये व महाविद्यालय डी.एड, बी एड कॉलेज असल्याने परिसरातील १२ ते १५ किलोमीटर अंतरावरील जवळपास २० गावातील विद्यार्थी-विद्यार्थिनी माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठी येथे विद्यार्जन करण्यासाठी येतात. चामोर्शी तालुक्यातील चौडमपल्ली,चंदनखेडी, मार्कंडा कंन्सोबा, लगाम सिंगनपल्ली या गावातील विद्यार्थ्यांना आष्टी



येथे जावे लागते. आष्टी मधून परत स्वगृही परत जाण्यासाठी बाजूला निवारा आहे, तोही मोडकळीस आलेला आहे व अखेरची घटका मोजत आहे परंतु आष्टी येथून परत जात असताना आष्टी या शहरात विद्यार्थ्यांना बसच्या प्रतीक्षेमध्ये तासभराहून अधिक काळ थांबावे लागत आहे, त्या बाजूला विद्यार्थिनींना बसण्याच्या निवारा नसल्याने मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. या ठिकाणी बसण्यासाठी निवारा व्हावा,अशी शालेय विद्यार्थिनींच्या वतीने माजी ग्रामपंचायत सदस्य भास्कर फरकडे यांच्याकडून मागणी केली जात आहे. सध्या मोठ्या प्रमाणावर उन्हाळा जाणवायला सुरुवात झाली आहे. मागील काही काळात प्रवासी निवारा मार्कंडा कंन्सोबा फाट्यावर बांधण्यात आला आहे परंतु त्या प्रवासी निवाऱ्याची संपूर्ण दुर्दशा झाली असून बसण्यायोग्यही नाही उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यात पावसापासून व उन्हाळ्यात उन्हापासून बचाव होण्यासाठी आजूबाजूच्या झाडांचा प्रवाशांना आश्रय घेऊन एसटीची प्रतीक्षा करावी लागत असे. एसटी आली की प्रवासी तिथपर्यंत पोहोचेपर्यंत एसटी तेथून निघून गेलेली असते. उन्हाळ्यात, तर प्रवाशांना व विध्यार्थांना उन्हापासून बचाव करण्यासाठी ताटकळत उभे राहावे लागत आहे. एक तर मार्कंडा कंन्सोबा फाट्यावर तीनही बाजूंनी वाहने आली की मोठ्या प्रमाणावर धुरळा उडतो. नाका-तोंडात धुळीकण जात असल्यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रतीक्षा करावी लागत आहे. प्रवाशांच्या सुरक्षतेसाठी शेड उभारण्यात यावा अशीही मागणी माजी ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार भास्कर फरकडे यांनी केली आहे.



# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत मातोश्रीचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा सन २०२३-२४च्या स्पर्धा माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा नेहरूनगर नागलगाव येथे पार पडल्या. सदरील खो-खो स्पर्धेत मातोश्री प्राथमिक आश्रम शाळा माळाकोळी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा सन २०२३-२४च्या स्पर्धा माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा नेहरूनगर नागलगाव येथे नुकत्याच दि.(११) रोजी पार पडल्या.यात लोहा तालुक्यातील माळाकोळी येथील मातोश्री प्राथमिक आश्रम शाळेतील १४ वर्षे वयोगटातील मुलांनी खो खो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले.या यशा बद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार रोहिदास चव्हाण, उपाध्यक्ष नवनाथ रोहिदास चव्हाण, संस्थेचे सचिव शेषराव कहाळेकर यांनी सर्व खेळाडू व शिक्षकांचे अभिनंदन केले.या यशासाठी शाळेतील मुख्याध्यापक ए. बी. जामगे, क्रीडा प्रमुख पी आर राठोड, आर. बी. बोधगिरे, सौ.आर. डी. जाधव, यु.बी.केंद्रे, एस.टी. कांजले, पी. डी. मोरताडे, एस.आर.बंडेवार, आर.एम. काठेवाडे, व्ही.पी.गवते, एस.जी जाधव, सौ.के.बी. ढवळे, सौ.व्ही.के.आडे, व्ही.बी. गोटमुकले, व्ही.बी. केंद्रे यांनी परिश्रम घेतले.

# साईंच्या शिर्डी शहरात भजन संध्या संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जयंत थेरे**

**शिर्डी :** साईच्या प्रती श्रध्दा व त्यामुळे झालेल्या आजारातून मिळालेली मुक्ती यामुळे नागपूर येथील साईभक्त जयंत थेरे यांनी शिर्डी येथे ओम साई म्युजीकल ग्रुप यांच्या वतीने शिर्डीतील साई मंदिराजवळ असलेल्या शताब्दी मंडपात अतिशय भक्तिमय वातावरणात साई भजन संध्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. साईभक्त जयंत थेरे नागपूर यांच्यासह सहकाऱ्यांनी साई भजन सध्याचा कार्यक्रम सादर केला. यावेळी गायक विशाल जोगदेव यांनी आपल्या सुमधुर आवाजात राम आये हे राम आये हे अशी विविध भक्तीमय साईबाबा वर आधारित विविध भजनाचे गायन केले उपस्थित साईभक्त भाविक देखील या कार्यक्रमात मोठ्या भक्तीमय वातावरणात तल्लीन झाले होते. यावेळी प्रथम साईबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यानंतर गणेश वंदना करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अनेक चिमुकली मुले आणि साईभक्त भजनात तल्लीन झाल्याचे दिसून आले. यावेळी भजन संध्या कार्यक्रमात तुषार कुरकुडे,विशाल जोगदेव, प्रतीक सावरकर,भोला डोळसकर, नितेश डोळसकर,कार्तिक जैन, स्नेहल खोब्राकडे,आशिष कठाळे व प्रशांत साकोते आदी सहभागी झाले होते.



# डॉ. जिंदल यांना काशीबाई फुलारी स्मृती पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** गोरठा येथील वरदानंद प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा काशीबाई फुलारी स्मृती नारायणी पुरस्कार प्रसिध्द स्त्री रोग तज्ञ आणि सेवाभावी समाजसेविका डॉ. तरू जिंदल यांना देण्यात येणार असल्याची माहिती वरदानंद प्रतिष्ठानच्या वतीने देवीदास फुलारी यांनी दिली. स्त्रीरोग शास्त्रात एम एस असलेल्या डॉ. तरु जिंदल या विद्यार्थी अवस्थेपासूनच महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित झालेल्या होत्या. स्त्रीरोग तज्ञ म्हणून आदिवासी भागांना भेटी देऊन स्त्रियांच्या आरोग्याच्या गरजा आणि समस्या त्यांनी जाणून घेतल्या.त्यांनी लिहिलेलं "हा ये मुमकिन है" या पुस्तकाला प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. त्या पुस्तकाचा मराठी अनुवाद पण झालेला आहे. वरदानंद प्रतिष्ठानने सुरू केलेल्या काशीबाई फुलारी स्मृति नारायणी पुरस्काराच्या डॉ. तरु जिंदल या पहिल्या मानकरी ठरलेल्या आहेत. रोख रक्कम रुपये ५ हजार मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे स्वरूप असलेल्या या पुरस्काराचे वितरण गोरठा येथे मंगळवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या चौथ्या मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. प्रफुल्ल कुलकर्णी, डॉ. रामेश्वर भाले आणि डॉ. माधव विभुते या त्रिसदसीय पुरस्कार समितीने डॉ. तरु जिंदाल यांची निवड केली आहे.




# जय महाराष्ट्र प्राथमिक शाळेत हळदी- कुंकू, सांस्कृतिक कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** जय महाराष्ट्र प्राथमिक शाळा लोहाच्या वतीने लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम व महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी एका पेक्षा एक अशी उत्कृष्ट सादरीकरण करून लहान बालकांनी श्रोत्यांना चार तास खेळवून ठेवले. विद्यार्थ्यांच्या विविध कलांना वाव मिळावा म्हणून हा कार्यक्रम शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता यावेळी या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात गणरायाच्या गाण्यापासून झाली त्यानंतर या कार्यक्रमात लोकगीते देशभक्तीपर गीते लावण्या नवीन व जुनी मराठी व हिंदी गीते प्रत्येकाची वेगवेगळी वेशभूषा केशभूषा आदीसह विविध गीतावर चिमुकल्यांनी आपली कला सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. नृत्य सादर करणाऱ्या कलावंत विद्यार्थ्यावर प्रेक्षकांकडून कौतुकाची थाप टाळ्याचा वर्षाव झाला यावेळी शाळेचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व त्यांचे पालक माता-पितासह शाळेच्या परिसरातील अनेक नागरिकांनी गर्दी करून उपस्थिती दाखवली होती. सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर मकर संक्रांति पासुन सुरु असलेल्या हळदी-कुंकवाचा कार्यक्रम चालू असतो. त्याचाच भाग म्हणून जय महाराष्ट्र प्राथमिक शाळा लोहा येथे हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यानंतर सौ चोले मॅडम यांनी संबंधित महिलांना हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमा उपस्थित असलेल्या महिलांना वाण म्हणून शैक्षणिक साहित्य पेन देण्यात आली अनेक महिलांचा सहभाग होता. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक एस. एच. भालेराव सर,सहशिक्षिका सौ.जे.डी चोले मॅडम, सहशिक्षक एस. एम कवठेकर, सहशिक्षक एन. एल वाघमारे सर, सहशिक्षक एस. एस कुलकर्णी ,सहशिक्षक आर.आर पारेकर सर, सहशिक्षक एम. आर राठोड सर आदी ने परिश्रम घेतले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# व्हॅलेंटाईन डेला करणार गुलाब फूल देऊन इरई खोलीकरणाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जिवनदायनी इरई नदी पूर्ण बुजली असल्यामुळे खोलीकरणाच्या मागणीला घेऊन अनेक राजकीय पक्ष , संस्था-संघटना, पुरपीडित व चंद्रपूरकर 18 वर्षांपासून झोपेचं सोंग घेतलेल्या शासन-प्रशासनाला जागे करण्यासाठी "गेट वेल सून" म्हणीत 14 फेब्रुवारी ला गुलाब फूल व निवेदन देऊन दाताळा पूल ते हडस्ती पर्यंत खोलीकरणाची मागणी करणार आहे.
चंद्रपूरकरांनी उभारलेलं इरई बचाव जनआंदोलन जलसंपदा दिन 22 मार्च 2006 पासून नदीच्या खोलीकरणाची मागणी सातत्याने करीत आहे.शासन-प्रशासनाने बुजलेल्या नदी कडे दुर्लक्ष केल्यामुळे सन 1986, 2006, 2013 व आता प्रत्येक वर्षी 2022, 2023 व भविष्यातही महापुराची संभावना पाहता नदीच खोलीकरण व्हायलाच पाहिजे ही भावना प्रत्येक चंद्रपूरकर व्यक्त करीत आहे.

एकीकडे पावसाळ्यात जनता पुरात बुडते व उन्हाळ्यात पाणी टंचाई ने व्याकुळ होत असतांना विना गरजेचे सुस्थितीत असलेले बसस्टॅण्ड तोडून नविन बस स्टॅन्ड, बगिचे, फव्वारे, सौंदर्यीकरणासाठी प्राण्यांचे पुतळे जे देखभाली अभावी सुस्थितीत राहूच शकत नाहीअसे एक ना अनेक सौन्दर्यकरण भगणावस्थेत गेले तसेंच अनेक भवनाचं बांधकाम, झुलता पूल व त्यावर कोणीही मागणी केली नसतांना 4 कोटीची लाईटिंग, 60% पेक्षा जास्त GST व अन्य अप्रत्यक्ष कर भरणाऱ्या गरीब जनतेला जिल्यात झालेल्या अनेक खर्चिक इव्हेंट मध्ये प्रवेश देण्यात भेदभाव केलेल्या अनेक निरर्थक बाबी वर शेकडो कोटी रुपये खर्च केल्याचे टेम्बा मिरविणारे जिल्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी 9 एप्रिल 2016 रोजी केलेली इरई पुनःरुजीवन व 24 डिसेंबर 2022 ला इरई खोलीकरणाची केलेल्या घोषने कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने जनतेला प्रत्येक वर्षी महापुराचा सामना करावा लागत आहे त्यामुळे जिल्ह्यातील अनेक राजकीय पक्ष, समाज-सामाजिक संस्था, युवक मंडळे, पुरपीडित, चंद्रपूरकर जनतेने संघटित होऊन इरईची आर-पारची लढाई येत्या 25 फेब्रुवारी पासून मोठ्या आंदोलनाने लढून व जनतेच्या घामाच्या कराच्या पैशाची उधळपट्टी करणाऱ्यांना येत्या सर्व निवडणुकीत अद्दल घडविण्यासाठी महापूर,पाणी टंचाई सह जनहिताच्या अनेक मुद्यावर लढण्याची तयारी केली आहे. आपल्या या आंदोलनात जनतेने मोठया संख्येने सामिल होण्याचे आव्हान इरई नदीसाठी लढणाऱ्या चंद्रपूरकरांनी केले आहे.



# मागण्या मंजूर, उपोषण सोडले, आश्वासने पूर्ण करावी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात होत असलेले व झालेले निकृष्ट तथा दर्जाहिन कामे ,अपूर्ण कामे व केलेल्या पुल कामांना रंगरंगोटी न करणे, कामांवर माहिती फलक न लावणे व यात ठेकेदारांना सुट देणे हा प्रकार थांबवावे व हाती घेतलेले व मंजूर कामे तातडीने करावे यासाठी दि.१२रोजी बाजार सावंगी येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा नलावडे आमरण उपोषण साठी बसले होते याची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता व सर्कलचे शाखा अभियंता सावजी यांनी आमरण उपोषण कर्त्याची भेट घेत दिलेल्या निवेदनातील मागण्या मंजूर करुन त्यांवर कारवाई करण्याचें आश्वासन दिले. दुध देवून उपोषण सोडवले. यावेळी सरपंच आप्पाराव पाटील नलावडे,माजी सरपंच भिमराव नलावडे,ग्रापं सदस्य पोपट काटकर, सय्यद लाल टेलर,चांद पठाण,माजी चेअरमन शिवाजी काटकर, कारभारी साळुंके,पल्हाळ, साळुंके सह नागरिक उपस्थित होते. दिलेल्या आश्वासनाची तातडीने पुर्तता न केल्यास पुन्हा आमरण उपोषण करण्याचे इशारा जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा नलावडे यांनी यावेळी दिला.



# गीता बाल विद्या मंदिर इंग्लिश स्कूलचे अकरा विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने आर्थिक दुबल घटकातील विद्यार्थ्यांसाठी पार पडलेल्या एनएमएमएस परीक्षेत बाजार सावंगी (ताः खुलताबाद) येथील गीता बाल विद्या मंदिर इंग्लिश स्कूलचे अकरा विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. या सर्वांना बारावीपर्यंत दरवर्षी बारा हजार रुपये याप्रमाणे शिष्यवृत्ती मिळणार आहे. मागील वर्षी 24 डिसेंबरला ही परीक्षा झाली होती. या सर्वांचा सत्कार करण्यात येऊन अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. संस्थापक दत्तात्रय गंडे, सचिव करुणागंडे, मुख्याध्यापिका निर्गुणा गायकवाड, धनंजय धोंडकर, लक्ष्मी कोलते, यशोदा नलावडे, मनीषा वाघ, छाया जाधव, प्रियंका स्वभावणे, अक्षय निमकर उपस्थित होते. तसेच भाजपा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे भीमराव नलावडे प्रकाश नलावडे यांचे पालक उपस्थित होते.

# संभाजीनगर येथे ग्रंथ प्रदर्शन, विक्री व विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या विद्यमाने दि. १३ व १४ फेब्रवारी २०२४ रोजी समता दर्शन वाचनालय सभागृह, समता नगर येथे 'छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव २०२३ ' चे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने ग्रंथदर्शन व ग्रंथ विक्री आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथोत्सवाचा आपण सर्वांनी लाभ घ्यावा. असे आव्हान सुभाष साबळे जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष सोळुंके अध्यक्ष जिल्हा ग्रंथालय डॉ.दादा गोरे,डॉ. मिलिंद दुसाने, सुनील हुसे ग्रंथालय संचालक अध्यक्ष १३ व १४ फेब्रवारी २०२४ रोजी कार्यक्रम होणार आहे. उद्घाटन सोहळा विशेष अतिथी येणार आहे. रावसाहेब दानवे अब्दुल सत्तार अतुल सावे डॉ.भागवत कराड संदिपान भुमरे पालकमंत्री छत्रपती अंबादास दानवे महाराष्ट्र विधान परिषद प्रमुख पाहुणे सय्यद इम्तियाज जलील लोकसभा सदस्य हरिभाऊ बागडे विधानसभा सदस्य प्रदीप जयस्वाल विधानसभा सदस्य अशोक गाडेकर ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य सतीश चव्हाण विधानसभा सदस्य संजय शिरसाठ विधानसभा उदय सिंग राजपूत विधानसभा सदस्य विक्रम काळे विधानसभा सदस्य प्रशांत बंब विधानसभा सदस्य रमेश बोरनारे विधानसभा सदस्य एस.के देशमुख शिक्षण अधिकारी माध्यमिक गुलाबराव मगर जिल्हा ग्रंथालय संघ आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

# केऱ्हाळ्यात तब्बल पंचवीस वर्षांनंतर एकत्र आले वर्गमित्र

आधुनिक केसरी न्यूज

**केऱ्हाळा :** जोगेश्वरी हायस्कुल पळशी येथे 1997-98 या वर्षातील बॅचेस चा एक आगळा वेगळा स्नेह मिलनाचा कार्यक्रम रविवारी दि 11 रोजी केऱ्हाळा येथील सावित्री बाई फुले हायस्कुलच्या मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी माजी विध्यार्थ्यांनी आजी माजी शिक्षकांना सन्मानित करण्यात आले, यावेळी कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण महर्षी सावित्रीबाई फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्यध्यापक गणेश बडक तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यध्यापक युवराज खांडेकर सर, बी.बी. तावरे, ए.जे.पांढरे, बी.एफ पांढरे, व्ही.एम देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी विद्यार्थ्यांनी आपापली ओळख परिचय व कौटुंबिक व्यवसायिक माहीती दिली. उपस्थीत शिक्षक व विद्यार्थांना स्मृती चिन्ह, श्रीरामाची फोटो फ्रेम, टोपी, चष्मा,भेट देण्यात आले व शाळेचे माजी विद्यार्थी राम बनसोड यांनी त्यांच्या भाषणामध्ये जुन्या आठवणींना उजाळा दिला व यावेळी उपस्थीत विद्यार्थी व शिक्षकासाठी सकाळी गहू हरभ-याची हुरडा पार्टी तर दुपारी स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हरी पांढरे व प्रस्ताविक उध्दव गिरी यांनी तर आभार राम बनसोड यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंकुश बन्सोड, मनोज पांढरे, सोमीनाथ पांढरे, ज्ञानेश्वर दुधे, सुखदेव जाधव,सुर्यभान बनसोड, कैलास बन्सोड यांनी परिश्रम घेतले. या स्नेह मिलन कार्यक्रमास के-हाळा, पळशी, लोनवाडी,धानोरा, उपळी सिल्लोड येथील सर्व माजी विद्यार्थी उपस्थीत होते. कार्यक्रमाचा राष्ट्रगिताने समारोह करण्यात आला.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर